# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २० मार्च, २०१८ / फाल्गुन २९, १९३९ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वित्त व नियोजन, वने मंत्री** | |
| **(२)** | **ग्रामविकास, महिला व बालविकास मंत्री** | |
| **(३)** | **वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५)** | **जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** | |
| **(६)** | **रोजगार हमी, पर्यटन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६२**

---

### बीड जिल्ह्यातील अंगणवाडी बांधकामासाठी मंजूर निधी अखर्चित असल्याबाबत

**(१) * ३८०२४ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील ४५० अंगणवाडी बांधकामासाठी मंजूर असलेला रुपये २२ कोटींचा निधी दोन वर्षापासून अखर्चित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद पदाधिकारी व सदस्य यांनी या निधीतून अंगणवाडी इमारतीचे बांधकाम करण्याचा निर्णय घेतलेला असतांना शासनाकडून मात्र या निधीतून प्रि-फॅब्रिकेटेड इमारती बांधण्याचा आग्रह केला जात असल्याने हा निधी सुमारे दोन वर्षापासून अखर्चित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेकडून याबाबत महिला व बालविकास विभागाच्या सचिवांशी लेखी पत्रव्यवहार केला जात असतानाही शासनाने जिल्हा परिषदेला स्वयंस्पष्ट अभिप्राय दिले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उघड्यावर भरणाऱ्या, इमारत नसलेल्या, जुनी इमारत मोडकळीस आलेल्या अंगणवाड्यांची तालुकानिहाय संख्येचा तपशील काय आहे, तसेच इमारत बांधकामासाठी शासन कधी निधी देणार आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजना बळकटीकरण व पुनर्रचना अंतर्गत राज्यात ३६३२ अंगणवाडी केंद्र बांधकामासाठी सन २०१५-१६ मध्ये रुपये १२२.५८ कोटी इतका निधी प्रि-फॅब्रिकेटेड स्ट्रक्चर टेक्नॉलॉजीचा वापर करुन बांधकाम करण्यासाठी १३ जिल्हयांना दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी वितरीत केला होता. केंद्र शासनाने १ अंगणवाडी बांधकामासाठी खर्चाची मर्यादा रुपये ४.५० लाख इतकी मान्य केलेली आहे. त्यापैकी ७५% इतका निधी रुपये ३,३७,५००/- केंद्र शासन देणार असून २५% निधी म्हणजे रुपये १,१२,५००/- इतका निधी राज्य शासनाने खर्च करावयाचा आहे. सन २०१५-१६ मध्ये प्रि-फॅब्रिकेटेड स्ट्रक्चर टेक्नॉलॉजीचा वापर करुन अंगणवाडी बांधकामासाठी उपलब्ध करुन दिलेल्या रुपये १२२.५८ कोटी निधीपैकी बीड जिल्हयासाठी ५५० अंगणवाडी केंद्र बांधकामासाठी रुपये १८.५६ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. केंद्र शासनाने अंगणवाडी बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन न दिल्यामुळे Shadow तरतूद म्हणून अर्थसंकल्पित केलेला निधी सन

२०१५-१६ मधील असल्यामुळे तो आता जिल्हा परिषदांना खर्च करण्यास परवानगी देता येणार नाही असे वित्त विभागाने कळविल्यामुळे सदर निधी कोषागारात भरण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार सदरचा अखर्चित सर्व निधी रुपये १८,५६,२५,०००/- दिनांक २०/०२/२०१८ रोजी शासनास चलनाद्वारे जमा करण्यात आलेला आहे.

शासनाचे अर्धशासकीय पत्र क्र.एबावि-२०१६/प्र.क्र.३०१/का.६, दिनांक ८ फेब्रुवारी, २०१८ नुसार प्रि-फॅब्रिकेटेड स्ट्रक्चर टेक्नॉलॉजीचा वापर करुन अंगणवाडी बांधकामाचा आराखडा शासनस्तरावर अंतिम झालेला नसल्याने दिनांक १५ जानेवारी, २०१० च्या शासन निर्णयानुसार आर.सी.सी. पध्दतीने अंगणवाडी केंद्राचे बांधकाम करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

(४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय, क्र.एबावि-२०१७/ प्र.क्र.१०१/का-६, दिनांक १५/१२/२०१७ अन्वये सन २०१७-१८ जिल्हा वार्षिक योजनेमधून अंगणवाडी दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पित केलेल्या निधीमधून तरतूद उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हा नियोजन समितीस विनंती करण्यात आलेली आहे.

| प्रकल्पाचे नाव | उघडयावर भरणारी अंगणवाडयांची संख्या | मोडकळीस आलेल्या अंगणवाडयांची संख्या |
|---|---|---|
| बीड-१ | ० | ३ |
| बीड-२ | ० | २ |
| माजलगाव | ० | ७ |
| गेवराई-१ | ० | १२ |
| गेवराई-२ | ० | ८ |
| केज | ० | ६ |
| आष्टी | ० | ११ |
| अंबाजोगाई | ० | ५ |
| पाटोदा | ० | ३ |
| वडवणी | ० | ३ |

| | | |
|---|---|---|
| परळी | ० | १२ |
| शिरुर | ० | ३ |
| धारुर | ० | ५ |
| एकूण | ० | ८० |

जिल्हयामध्ये एकही अंगणवाडी केंद्र उघडयावर चालविण्यात येत नाही. जिल्हयात मोडकळीस आलेल्या अंगणवाडी इमारतींची संख्या ८० असून यापूर्वी मोडकळीस आलेल्या अंगणवाडी केंद्रांच्या दुरुस्तीकरीता कोणतेही प्रावधान नव्हते. परंतु आता महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दिनांक १५ डिसेंबर, २०१७ नुसार सन २०१७-१८ पासून जिल्हा नियोजन व विकास परिषद अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून नवीन अंगणवाडी बांधकामासाठी ५०% व जुन्या अंगणवाडी केंद्रांची किरकोळ दुरुस्ती तसेच ज्या अंगणवाडीत शौचालये नाहीत तेथे शौचालये बांधण्यासाठी ५०% प्रमाणे निधी खर्च करण्यास मान्यता दिलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जे.जे. रुग्णालयाचे सुपरस्पेशालिटी रुग्णालयात रुपांतर करण्याबाबत

**(२) * ३८०७८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जे.जे. रुग्णालयाचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय बांधण्यासाठी रुपये ८८१ कोटींचा आराखडा तयार करण्यात आला असून महानगरपालिका प्रशासनाकडून त्यासाठी आवश्यक त्या परवानगी देण्यास विलंब होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच या सुपरस्पेशालिटी रुग्णालयामुळे हजारो गोरगरीब रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळणार असल्याने या कामात विलंब करणाऱ्या महानगरपालिका अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जे.जे. रुग्णालयाचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय बांधण्याच्या आराखडयाला मान्यता देऊन सदरील कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
सर जे.जे. रुग्णालयाचे अतिविशेषोपचार रुग्णालय बांधकामांबाबत प्राप्त प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुळे (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील नदीवर पूल बांधण्याबाबत

**(३) * ३८६७४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुळे (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील मुळे येथील नदीवर पूल नसल्यामुळे पावसाळ्यात तेथील ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना १० किलो मीटरचा वळसा घालून मुलभूत सुविधांसाठी शहरी ठिकाणी जावे लागते तसेच रस्ताही अरूंद असल्यामुळे वाहतुकीस त्रासदायक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुळे येथील नदीवर पूल बांधल्यास तेथील ग्रामस्थांना गोंधळपाडा मार्गे कमी वेळात व कमी अंतरात शहरी ठिकाणी जाण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर नदीवर पूल बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे. प्रश्नांकित अलिबाग रेवस मार्ग ते बामणगाव मुळे या १.०० कि.मी. लांबीच्या ग्रामीण मार्ग क्र. ४९ या रस्त्यावर पूल बांधणेची आवश्यकता आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) उपरोक्त ग्रामीण मार्ग क्र. ४९ हा १.०० कि.मी. लांबीचा रस्ता सद्य:स्थितीत मातीचा कच्च्या स्वरुपाचा आहे. सदरहू ठिकाणी पूल बांधकाम करणेकामी सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग यांच्यामार्फत नाबार्ड कर्जसहाय्य योजनेंतर्गत आर.आय.डी.एफ. २२ अंतर्गत रुपये १००.०० लक्ष चा प्रस्ताव अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोकण भवन नवी मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साखरे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील (जि.पालघर) देहरजी मध्यम प्रकल्पातील शेतकऱ्यांचे पुनर्वसन करणेबाबत

**(४) * ३८९४१ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साखरे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील (जि.पालघर) देहरजी मध्यम प्रकल्पातील बुडीत क्षेत्रातील ५०० गरीब शेतकऱ्यांनी प्रकल्पाच्या कामाचा बराच कालावधी गेल्याने नविन घरे बांधलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन बांधलेल्या घरांमुळे त्यांचे क्षेत्रही वाढल्यामुळे शेतकऱ्यांनी जुना सर्व्हे रद्द करुन नवीन सर्व्हे करुन त्याप्रमाणे विस्थापितांचे पुनर्वसन करावे, अशी मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने बाधित शेतकऱ्यांना योग्य मोबदला व त्यांच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) बुडीत क्षेत्रात अल्प प्रमाणात नवीन घरे बांधल्याचे क्षेत्रिय कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे.
(२) नाही. साखरे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांची जुना सर्व्हे रद्द करुन नवीन सर्व्हे करुन त्याप्रमाणे विस्थापितांचे पुनर्वसन करणेसंबंधीची कोणतीही मागणी प्राप्त नाही.
(३) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि प्रकल्पग्रस्तांच्या घरांचे सर्वेक्षण सन २००६-०७ साली पूर्ण करण्यात आले होते. तद्‌नंतर केंद्र शासनाच्या वन विभागाची मान्यता, प्रकल्पाच्या घटक भागांचे संकल्पन, वसई विरार शहर महानगरपालिकेसोबत सामंजस्य करार न झाल्याने व निधीची अनुपलब्धता यामुळे प्रत्यक्ष प्रकल्पाचे काम अद्‌याप सुरु झालेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील निवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचा लाभ सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे देण्याबाबत

**(५) * ३८२९७ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जानेवारी, २००६ ते फेब्रुवारी, २००९ या तीन वर्षाच्या कालावधीत निवृत्त झालेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचे लाभ पाचव्या

आयोगाप्रमाणे दिले आहेत ते सहाव्या आयोगाच्या वेतनश्रेणीनुसार देण्याबाबतचे निदेश मा.सर्वोच्च न्यायालयाने शासनाला माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निदेशानुसार सदर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे लाभ देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार** : (१) जानेवारी, २००६ ते फेब्रुवारी, २००९ या कालावधीत निवृत्त झालेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित निवृत्तीवेतन अनुज्ञेयतेबाबत शासनाने दाखल केलेली पुनर्रीक्षण याचिका मा.उच्च न्यायालयाने फेटाळल्यानंतर शासनाच्यावतीने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ११/१०/२०१७ च्या आदेशान्वये फेटाळली.

(२) व (३) राज्य शासनाने दिनांक ०१/०१/२००६ ते २६/०२/२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित निवृत्तीवेतनाचे लाभ अनुज्ञेय केले नाहीत. हा निर्णय कायम राहण्याच्यादृष्टीने शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिकेवर मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ११/१०/२०१७ रोजी शासनाच्या विरोधात निर्णय दिला. त्यावर शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल केली. सदर पुनर्विलोकन याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २२/०२/२०१८ च्या आदेशान्वये फेटाळली. त्यामुळे आता सदर प्रकरणी Curative Petition दाखल करण्याच्यादृष्टीने विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्याची कार्यवाही चालू आहे.

-----------------

## खुडज (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथे जलयुक्त शिवार योजनेंतर्गत बंधाऱ्याचे कामे सुरु करण्याबाबत

**(६) * ३९१७६ श्री.रामराव वडकुते** : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खुडज (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथे जलयुक्त शिवार योजनेंतर्गत चार बंधाऱ्याचे भूमिपूजन होऊनही अद्यापपर्यंत कामे सुरु झाली नसल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) खुडज ता.सेनगाव गावात जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-१७ मध्ये विविध यंत्रणेमार्फत ९२ कामे पूर्ण झालेली आहेत.

पाण्याच्या ताळेबंदानुसार खुडज गावाला एकूण १०४८ स.घ.मी. (टि.सी.एम.) पाण्याची गरज आहे. जुन्या व नविन कामांमुळे १११० स.घ.मी. एवढे पाणी अडविल्यामुळे गावाच्या गरजेच्या तुलनेत ६२ स.घ.मी. (टि.सी.एम.) पाणी जास्त आहे. त्यामुळे सिंनाबा क्र. १, २, ४ व ५ ही कामे जिल्हास्तरीय समितीने प्रलंबित ठेवलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अक्कलकोट (जि.सोलापूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(७) * ३८४०५ श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट (जि.सोलापूर) येथे रुग्णसेवेसाठी आठ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत असून या ठिकाणी निम्म्याहून अधिक वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आठ प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी १६ वैद्यकीय अधिकाऱ्यांची आवश्यकता असतांना पाच अधिकारी कार्यरत असून ११ पदे रिक्त आहेत तसेच आरोग्य सेवक, आरोग्यसेविका, शिपाई, नर्स, एएनएम अशी अनेक पदे रिक्त असल्याने रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) खरे नाही. त्याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| वैद्यकीय अधिकारी | १६ | १५ | ०१ |
| आरोग्य सेवक | ४० | ३८ | ०२ |
| आरोग्य सेविका | ४७ | ४३ | ०४ |
| परिचर | ३३ | १९ | १४ |

वरील प्रमाणे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे भरली असून त्यांच्यामार्फत रूग्णांना आवश्यक सेवा उपलब्ध करून दिल्या जातात.

(३) वैद्यकीय अधिकारी पदावर भरतीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले असून वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे भरण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील रक्तपेढ्या रक्तपिशवीकरिता जादा शुल्क आकारीत असल्याबाबत

**(८) * ३८६३७ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ**

**राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ, ॲड.अनिल परब, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामनिवास सिंह, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासनाने कायद्यानुसार नियमांची अंमलबजावणी न करणाऱ्या १२ रक्तपेढयांचे परवाने निलंबित केले असून एक रक्तपेढीचा परवाना माहे एप्रिल ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत रद्द केला आहे, सदरहू रक्तपेढया कोणत्या आहेत,

(२) राज्यातील रुग्णालयांमध्ये रुग्णांना आवश्यक असलेला पुरेसा रक्त पुरवठा उपलब्ध नसल्याची व राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेच्या नियमांचे उल्लंघन होत असून अनेक रक्तपेढ्या रक्तपिशवी प्लाझमा, प्लेटलेट्स या घटकांसाठी जादा शुल्क आकारीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील शासकीय व खाजगी रक्तपेढ्या रक्तपिशवीसाठी निर्धारित दरापेक्षा जादा शुल्क (रुपये १५०० ते ३३००) आकारणी करत असल्याचे राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेच्या तपासणीत माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मुंबईतील २५ खाजगी रक्तपेढ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषीं रक्तपेढ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच पुरेशा रक्त पुरवठयाअभावी व अवाजवी दरांमुळे रुग्णांची गैरसोय होऊ नये यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाने कळविल्याप्रमाणे माहे एप्रिल, २०१७ ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत अन्न व औषध प्रशासनाच्या नियमांची अंमलबजावणी न करणाऱ्या एका रक्तपेढीचा परवाना रद्द करण्यात आलेला आहे व १३ रक्तपेढ्यांचे परवाने तात्पुरत्या स्वरुपात निलंबित करण्यात आलेले आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

राज्यातील रक्तपेढ्यांमध्ये पुरेसा रक्त पुरवठा उपलब्ध होता. तथापि, माहिती आयोगाच्या आदेशानुसार मागविण्यात आलेल्या माहितीच्या आधारे सकृतदर्शनी असे दिसून आले होते की, काही रक्तपेढ्या प्रक्रिया शुल्क जादा आकारीत आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

शासकीय रक्तपेढ्यांमध्ये शासनाने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे प्रक्रिया शुल्क आकारले जाते. तथापि, काही खाजगी रक्तपेढ्यांकडून जादा प्रक्रिया शुल्क आकारल्याचे माहितीच्या अधिकारांतर्गत मागविण्यात आलेल्या माहितीच्या आधारे सकृतदर्शनी दिसून आले.

(४) होय, हे खरे आहे. २५ रक्तपेढ्यांकडून खुलासा मागविण्यात आला आहे.

(५) माहिती आयोगाच्या आदेशानुसार मागविण्यात आलेल्या माहितीच्या आधारे सकृतदर्शनी असे दिसून आले होते की, काही रक्तपेढ्या प्रक्रिया शुल्क जादा आकारीत आहेत. या माहितीच्या आधारावर ७२ खाजगी व धर्मादाय संस्था संचलित रक्तपेढ्यांकडून खुलासा मागविण्यात आला होता. त्यामध्ये मुंबईतील २५ खाजगी रक्तपेढ्यांचा समावेश होता. संबंधित रक्तपेढ्यांनी खुलाशामध्ये असे नमूद केले आहे की, प्रक्रिया शुल्काच्या (Processing Charges) माहितीमध्ये अतिरिक्त चाचणी विशेष चाचणी शुल्काचा (Additional test & Specialize Component Specific test) समावेश आहे.

राज्यात पुरेसा रक्तसाठा उपलब्ध आहे. तथापि, रुग्णाच्या सोयीसाठी सर्व रक्तपेढ्यांना दररोजचा रक्ताचा उपलब्ध साठा व प्रक्रिया शुल्क, अतिरिक्त चाचणी शुल्क इत्यादीबाबत माहिती प्रत्येक रक्तपेढीच्या दर्शनी भागात लावण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे जांभुळ (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील जमीन डॉ.बी.आर.आंबेडकर प्रतिष्ठान संस्थेस देण्याबाबत

**(९) * ३८०१६ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जांभुळ (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे सन १९३६ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी खरेदी केलेल्या २२ एकर शेतजमिनीपैकी (फेरफार नं. १२१ व फेरफार नं. १८०) काही जमिनीवर शासनाच्या महिला बालविकास खात्याच्या अंतर्गत सर्टिफाईड स्कूल चालविले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सर्टिफाईड स्कूलचे बांधकाम क्षेत्र वगळता भू.क्र. ६/३ व ६/५ मध्ये एकूण क्षेत्र २.७४.४० हेक्टर आर व क्षेत्र ०.४५.० हेक्टर आर जागा मोकळ्या स्वरुपात पडीक असून सदर मोकळ्या जागेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नियोजित स्मारकाचे बांधकाम शासनाकडून करुन डॉ.बी.आर. आंबेडकर प्रतिष्ठान संस्थेला देण्यात यावी, अशा आशयाचे निवेदन मा.मुख्यमंत्री, मा.महिला बालविकास मंत्री, मा.सामाजिक न्याय मंत्री, जिल्हाधिकारी, ठाणे व तहसिलदार, कल्याण यांना अध्यक्ष, डॉ.बी.आर. आंबेडकर प्रतिष्ठान यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर जागा डॉ.बी.आर.आंबेडकर प्रतिष्ठानला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) स.नं. ६/३ क्षेत्र १ हेक्टर १७ आर व स.नं. ६/५ क्षेत्र ४५ आर ही जागा महिला व बालविकास विभागांतर्गत अधिक्षक, सर्टिफाईड स्कूल यांचे नांवे आहे. सदर सर्टिफाईड स्कूलमध्ये लहान मुले असल्याने व शहरी भागापासून दूर असल्याने सर्टिफाईड हायस्कूल उल्हासनगर येथे स्थलांतर करुन त्या जागी पुरुष भिक्षेकरी गृह (बेगर्स होम) सन १९७२ पासून राबविण्यात येत आहे.

(२) होय.

(३) व (४) याबाबतची सद्य:स्थिती संबंधित विभागाकडून मागविण्यात आली आहे.

-----------------

## गोकुळदास तेजपाल रूग्णालय, मुंबई येथील कार्यरत असलेल्या चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत

**(१) * ३९०८९ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोकुळदास तेजपाल रूग्णालय, मुंबई येथील तृतीयश्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे रूग्णांना वेळेवर सेवा देतांना तृतीयश्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांचे हाल होत असल्याने सदरहू रूग्णालयात कार्यरत असलेल्या चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीने तृतीयश्रेणी संवर्गामध्ये पदोन्नती देण्याबाबत अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना, मुंबई यांनी अधिष्ठाता, सर ज.जी. समूह रुग्णालय, मुंबई यांच्याकडे दिनांक ४ मे, २०१७ रोजी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रूग्णालयातील रूग्णांना वेळेवर योग्य सेवा देता यावी याकरीता अनेक वर्षे चतुर्थश्रेणी संवर्गामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीने तृतीयश्रेणी संवर्गामध्ये बढती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटना, मुंबई यांच्या दिनांक ४ मे, २०१७ रोजीच्या लेखी निवेदनाची नोंद अधिष्ठाता, सर ज.जी. समूह रुग्णालय, मुंबई यांच्या कार्यालयीन आवक नोंदवहीत आढळून आली नाही.

(२) चतुर्थश्रेणी संवर्गातील कर्मचाऱ्यांना वर्ग-३ मधील ज्या विविध संवर्गातील पदांवर पदोन्नती देण्यात येते त्या सर्व संवर्गात मिळून संबंधित संस्थेतील पदोन्नतीच्या कोटयातील केवळ २ पदे सद्य:स्थितीत रिक्त आहेत व ही २ पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार व चंद्रपूर जिल्हयातील अतिदुर्गम भागातील लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ मिळून देण्याबाबत

**(११) * ३९१२८ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हयांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी आदिवासी तसेच दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी १५ हजार ६०० घरकुल बांधण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचा निधी लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर डीबी द्वारे देण्यात येणार असल्याने नंदुरबार व चंद्रपूर अतिदुर्गम भागातील आदिवासी, दारिद्र्य रेषेखालील प्रवर्गातील लाभार्थांना बँक खाते उघडण्यास तसेच ऑनलाईन मंजूरी मिळण्यास अडचणी येत असल्याने सदरील लाभार्थी हक्काच्या घरांपासून वंचित राहत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन असल्याने चुकीच्या लाभार्थांना सदरील योजनेचा लाभ मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चुकीच्या लाभार्थींवर कारवाई करुन नंदुरबार व चंद्रपूर जिल्हयातील अतिदुर्गम भागातील आदिवासी, दारिद्र्य रेषेखालील प्रवर्गातील वंचित असणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजनेचा योग्य लाभ लाभार्थ्यांना मिळून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गासाठी निश्चित केलेले घरकुलाचे उद्दिष्ट खालीलप्रमाणे

| | अ.जा. | अ.ज. | अल्प. | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| राज्य | ४१०८१ | ५०२१० | १२८२८ | ४६८१५ | १५०९३४ |
| चंद्रपूर | ११३३ | १००३ | ९६२ | १४०५ | ४५०३ |
| नंदूरबार | २८५ | १४७५३ | ९६ | ४६६ | १५६०० |

तथापि, केंद्र शासनाच्या निर्देशानुसार प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत लाभार्थ्यांची निवड सामाजिक आर्थिक व जात सर्वेक्षण-२०११ च्या माहितीच्या आधारे केली जाते.

(२) व (३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयातील रुग्णसेवेचे दर वाढल्याबाबत

**(१२) * ३७६४८ श्री.सतेज उर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय आणि दंत महाविद्यालयातील औषधोपचारासाठी आणि तपासणीसाठी आकारण्यात येणाऱ्या सेवाशुल्कात दुपटीने वाढ केल्यामुळे शासनाच्या नव्या अध्यादेशामुळे छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयातील रुग्णसेवेचे दर दुपटीने वाढले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी औषधोपचार, तपासणी, नोंदणी शुल्कात दुपटीने वाढ व मोफत असलेल्या प्रसूतीसाठीही पैसे मोजावे लागणार असल्याने येथील रुग्ण व नातेवाईकांमध्ये नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गरीब रुग्णांना सवलतीत औषधोपचार मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे. विभागाच्या दिनांक २०/११/२०१७ व दिनांक १०/०१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व शासकीय महाविद्यालये व रूग्णालयांमधील रूग्णशुल्कात माफक दरवाढ करण्यात आलेली आहे.

(२) नाही.

(३) शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, दिनांक ०४/०७/२०१७ नुसार गोर-गरीब रूग्णांना मोफत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयात लघुसिंचन (जलसंधारण) विभागाने विविध बंधाऱ्यांचे दरवाजे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१३) * ३८७३९ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात लघुसिंचन (जलसंधारण) विभागाने १०० ते १५० हेक्टर सिंचन क्षमतेचे ८० बंधारे बांधले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध बंधाऱ्यांचे ९५० दरवाजे गहाळ झाले तर ९०० दरवाजे ना दुरुस्त झाले असून त्यासाठी रुपये १ कोटी २० लक्ष रुपयांची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लघुसिचंन (जलसंधारण) विभागाने शासनाच्या यांत्रिक विभागास दरवाजे तयार करण्यासाठी प्रस्ताव दिला परंतु सदर प्रस्ताव दोन वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दरवाजे त्वरीत उपलब्ध झाल्यास शेकडो गावांचा पाणी प्रश्न मार्गी लावण्यास मदत होणार आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दरवाजे उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, औरंगाबाद या विभागामार्फत ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेमधील ८२ कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधण्यात आले आहेत.

त्यापैकी ३६ को. प. बंधाऱ्यांचे ९४० दरवाजे गहाळ/चोरीस गेले असून ०४ को.प. बंधाऱ्यांचे ५५२ दरवाजे नादुरूस्त झाले आहेत. गहाळ/ चोरीस गेलेल्या दरवाज्याच्या ठिकाणी नवीन दरवाजे खरेदी करणेसाठी रुपये ७९.९१ लक्ष व नादुरूस्त दरवाजे दुरूस्त करणेसाठी रुपये ४.८६ लक्ष अशी एकूण रुपये ८४.७७ लक्ष निधीची आवश्यकता आहे.

लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, औरंगाबाद यांनी दरवाजे तयार करणेसाठी शासनाच्या यांत्रिकी विभागास दिनांक ०१/०६/२०१७ च्या पत्रान्वये प्रस्ताव पाठविला असता, यांत्रिकी विभागाने त्यांचे पत्र दिनांक ०७/०६/२०१७ व पत्र दिनांक १९/०९/२०१७ अन्वये दरवाजे तयार करणेसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, औरंगाबाद यांस कळविले आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) व (६) लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र दिनांक ०१/०८/२०१७ व दिनांक ०४/०२/२०१८ अन्वये जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना ४३ कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांच्या दुरूस्तीसाठी जिल्हा नियोजन समिती, औरंगाबादच्या वार्षिक आराखड्यात रुपये ९९.०८ लक्षची तरतूद समाविष्ट करणेबाबत विनंती केली होती, तथापि, निधीची तरतूद होऊ शकली नाही.

सद्य:स्थितीत नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक ०१/०१/२०१८ च्या पत्रानुसार सन २०१८-१९ मध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत राबवावयाच्या योजनांच्या यादीतील अनुक्रमांक ४८ व ५१ नुसार ० ते १०० हेक्टर आणि १०१ ते २५० हेक्टर प्रकल्पांच्या बांधकाम व दुरूस्तीचा अंतर्भाव करण्यात आला आहे. त्यानुसार प्रस्तावित दुरूस्ती कामासाठी आवश्यक असलेला रुपये ३३५.१८ लक्षचा निधी मागणी प्रस्ताव जिल्हाधिकारी, औरंगाबाद तथा अध्यक्ष जिल्हा नियोजन समिती, औरंगाबाद यांना सादर करण्याची कार्यवाही लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, औरंगाबाद यांचेकडून प्रगतिपथावर आहे.

-----------------

## नागपूर-अमरावती महामार्गावरील वाडी येथे शासकीय रुग्णालय सुरू करण्याबाबत

**(१४) * ३८३१० प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-अमरावती महामार्गावरील वाडी शहराची लोकसंख्या वाढत असून तेथे शासकीय रूग्णालय नसल्याने नागरिकांना आरोग्य सुविधेपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त ठिकाणी रुग्णालय बांधण्याचा प्रस्ताव शासनाला प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासकीय रूग्णालय सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

वाडी येथे दिनांक ०७/११/२००९ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण रूग्णालय मंजूर करण्यात आले आहे.

(२) व (३) सदर ग्रामीण रूग्णालयासाठी १.०० हेक्टर जागा देण्यास वन विभागाने मान्यता दिली असून जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती लागू करण्याबाबत

**(१५) * ३८९२७ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एससी, एसटी, विमुक्त जाती, भटक्या जमाती, ओबीसी व विशेष मागास प्रवर्ग घटकांच्या विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती लागू करा अशा आशयाचे निवेदन यवतमाळ येथील भारतीय पिछडा ओबीसी संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी यांना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विमुक्त जाती, भटक्या जमाती, ओबीसी व विशेष मागास प्रवर्ग घटकांच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.
(२) व (३) सदर बाब तपासण्यात येत आहे.

-----------------

## अलिबाग, मुरुड, जंजिरा, श्रीवर्धन (जि.रायगड) येथील अपुऱ्या पायाभूत सुविधांबाबत

**(१६) * ३८३२९ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.मोहनराव कदम, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५५८७ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग, मुरुड, जंजिरा, श्रीवर्धन (जि.रायगड) परिसरात पर्यटकांची वाढती संख्या विचारात घेता येथील पायाभुत सुविधा अपुऱ्या पडत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्ह्यातील ५९ गावांच्या पर्यटन विकासासाठी २४३ कोटी रुपयांचा पर्यटन विकास आराखडा तयार असूनही २ वर्षे उलटूनही आराखड्याला शासनाकडून मंजूरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्ते, वीज, पाणी, पार्कींग, सार्वजनिक स्वच्छतागृहे या सुविधांअभावी पर्यटकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) याबाबत शासन तातडीने पर्यटन विकास आराखड्यास मान्यता देणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) नाही.

(२), (३) व (४) नाही. रायगड जिल्हा पर्यटन बृहद विकास आराखड्यास शासनाने मान्यता दिली असून त्याबाबत दिनांक १८/१२/२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यात आमदार आदर्श ग्राम योजनेच्या अंमलबजावणीबाबत

**(१७) * ३७६८३ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या आदर्श ग्राम योजनेच्या धर्तीवर राज्यात आदर्श ग्राम योजना राबविण्यासाठी माहे जुलै, २०१९ पर्यंत तीन ग्रामपंचायतींची निवड करून विधानमंडळ सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित करण्याचा शासनाने दिनांक २० मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्णय घेवूनही नाशिक जिल्ह्यात माहे जानेवारी, २०१८ पर्यंत प्रती आमदार फक्त एका ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यात आमदार आदर्श ग्राम योजनेसाठी निवड केलेल्या गावांचे विकास आराखडे तयार नसल्यामुळे या योजनेचे काम अद्याप सुरु झालेले नाही तसेच आमदार निधीतून घेण्यात येणाऱ्या अनुज्ञेय कामासाठी शासनाने माहे जानेवारी, २०१८ पर्यंत जोड निधी उपलब्ध करून न दिल्यामुळे दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी जिल्हाधिकारी, नाशिक व मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने नाशिक जिल्ह्यात आदर्श ग्राम योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) नाशिक जिल्ह्यात एकूण १८ विधानमंडळ सदस्यांनी प्रत्येकी १ याप्रमाणे पहिल्या टप्प्यात १८ गावांची निवड केलेली असून सर्व गावांचे विकास आराखडे तयार करण्यात आले आहेत. मा.श्री.छगन भुजबळ, माजी उपमुख्यमंत्री यांचे तक्रारीचे जोडनिधी मागणीबाबतचे दिनांक १५ जानेवारी, २०१८ चे पत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या कार्यालयाकडे दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी प्राप्त झाले आहे.

(३) दिनांक १२ मार्च, २०१८ रोजी आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत जोडनिधीचे प्रमाण निश्चित करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्ह्यात महिला बचत गटांना कर्ज वाटपाबाबत

**(१८) * ३८९२५ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात ८००० महिला बचत गट असून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बँकेकडून ४२.८५ कर्जवाटपाचे उद्दीष्ट असतांना केवळ ११ कोटी रूपयांचे कर्ज वाटप झाल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बचत गटांना उद्योगासाठी कर्ज न देणाऱ्या बँकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वैजापूर (जि.औरंगाबाद) येथील ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१९) * ३८५५९ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) येथील ग्रामीण भागात रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याने काही दिवसातच रस्ते पूर्ववत खड्डेमय झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सर्व विभागांना लागणारी औषधे हाफकीनकडून खरेदी करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२०) * ३९१९८ श्री.मोहनराव कदम, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोणत्याही शासकीय विभागातर्फे खरेदी केली जाणारी औषधे व वैद्यकीय सामुग्री शासनाच्या हाफकिन महामंडळामार्फतच खरेदी करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्र्यांनी देवून ६ महिने झाले असतानाही त्याची अंमलबजावणी करण्यास शासन दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णय अस्तित्वात असताना, वैद्यकीय शिक्षण विभागाला मात्र दर करारानुसार औषध खरेदी करण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याने हाफकीन महामंडळ नावापुरतेच राहिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मंडळास उर्जितावस्था प्राप्त करुन देण्यासाठी वैद्यकीय शिक्षण मंडळास दर करारानुसार औषध खरेदीचा निर्णय मागे घेण्याबाबत तसेच औषधांच्या आणि वैद्यकीय सामुग्रीच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याकरिता खाजगी व शासकीय रुग्णालये तसेच मेडिकल्स मधील सर्व विभागांना लागणारी औषधे हाफकीनकडूनच खरेदी करण्याचा निर्णय प्रभावीपणे अंमलात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. येथील खरेदी कक्ष दिनांक १५/०८/२०१७ पासून कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. मार्फत प्रचलित कार्यपध्दतीनुसार खरेदी प्रक्रिया पूर्ण होवून औषधांचा पुरवठा होण्यास काही काळ लागणार असल्याने रुग्णसेवेत अडथळा येवू नये यास्तव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दिनांक १७/०१/२०१८ च्या शासन निर्णयान्वये औषधी विषयक बाबींच्या संपुष्ठात आलेल्या दरकरारांना दिनांक ३१/०१/२०१८ पर्यंत किंवा हाफकिन महामंडळाकडून सुरळीत पुरवठा होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

(३) राज्य शासनाच्या सर्व विभागांनी हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि. मार्फतच औषधे, तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे यांची खरेदी करणे बंधनकारक राहील, अशी तरतूद दिनांक १७/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोट (जि.अकोला) तालुक्यातील प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याबाबत

**(२१) * ३८२०४ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला नेरधामणा, उमा बॅरेज, हिवरा शहापूर, वृहन, वाई संग्राहक, नया अंदूरा संग्राहक, सुकळी संग्राहक, कंचनपूर बृहत, कवठा बॅरेज, काटीपाटी बॅरेज, शहापूर (ता.अकोट) इत्यादी प्रकल्पांना आजपर्यंत शासनाने एकूण किती निधी मंजूर केला व प्रत्यक्षात किती निधी खर्च करण्यात आला,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पांपैकी किती प्रकल्पांचे काम पूर्ण झाले व किती प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहे, तसेच या प्रकल्पांचे काम निकृष्ट दर्जाचे झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पांचे काम करतांना कंत्राटदारांना आगाऊ रक्कम देण्यात आली आहे तसेच उपरोक्त प्रकल्पांपैकी अनेक प्रकल्पाची कामे सुधारित प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकल्पांवर निधी खर्च झाल्यानंतर सुध्दा अत्यंत कमी जमीन सिंचनाखाली येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) प्रकल्पनिहाय उपलब्ध केलेला एकूण निधी व मार्च, २०१७ अखेर झालेला खर्च याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रुपये कोटी)

| अ.क्र. (१) | प्रकल्पाचे नांव (२) | मार्च-२०१७ पर्यंत उपलब्ध करण्यात आलेला एकूण निधी (३) | मार्च-२०१७ पर्यंत झालेला एकूण खर्च (४) |
|---|---|---|---|
| १ | नेरधामणा मध्यम प्र. | ६००.९१ | ६००.९१ |
| २ | उमा बॅरेज मध्यम प्र. | २५९.२४ | २५९.२४ |
| ३ | हिवरा ल.पा. | ११.५१ | ११.५१ |
| ४ | शहापूर बृहत ल.पा. | १८९.४२ | १८९.४२ |
| ५ | वाई संग्राहक ल.पा. | ९०.९२ | ९०.९२ |
| ६ | नया अंदूरा (सं).ल.पा. | ८६.२८ | ८६.२८ |
| ७ | सुकळी संग्राहक ल.पा. | २५.३७ | २५.३७ |
| ८ | कंचनपूर बृहत ल.पा. | १.०० | १.०० |
| ९ | कवठा बॅरेज ल.पा. | १०९.९८ | १०९.९८ |
| १० | काटीपाटी बॅरेज ल.पा. | २.५४ | २.५४ |
| ११ | शहापूर ल.पा. | २६.७१ | २६.७१ |
| | एकूण :- | १४०३.८८ | १४०३.८८ |

वरील बांधकामाधीन प्रकल्पांना सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षात एकूण रुपये २७४.२१ कोटी निधी उपलब्ध असून जानेवारी, २०१८ पर्यंत एकूण रुपये १३४.६२ कोटी खर्च झालेला आहे.

(२) उक्त प्रकल्पांपैकी हिवरा व सुकळी या २ प्रकल्पांची कामे जवळपास पूर्ण झालेली असून पाणीसाठा करण्यात आलेला आहे. शहापूर बृहत प्रकल्पाची घळभरणी करण्यात आलेली असून वितरण प्रणालीचे काम बाकी आहे. तसेच नेरधामणा, शहापूर बृहत, वाई संग्राहक, नया अंदूरा संग्राहक, कवठा बॅरेज, शहापूर ल.पा. ह्या ६ प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत. प्रकल्पांची कामे निकृष्ट दर्जाची झालेली नाहीत. कंचनपूर प्रकल्पाचे काम स्थानिक विरोधामुळे रद्द करण्याचा प्रस्ताव विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे नियामक मंडळात मंजूर झाला असून शासनाच्या मंजुरीस्तव विचाराधीन आहे.

(३) उक्त प्रकल्पांपैकी पूर्णा बॅरेज-२, उमा बॅरेज व शहापूर बृहत ल.पा.यो. च्या कंत्राटदारास आगाऊ रक्कम देण्यात आली असून संबंधित विभागाने व्याजासह वसूल केलेली आहे.

प्रकल्पाची कामे सु.प्र.मा. न मिळाल्यामुळे प्रलंबित नसून त्यास पर्यावरण मान्यता, विशिष्ट संकल्पन इत्यादी कारणे आहेत. तथापि, कामे प्रगतीपथावर आहेत. नेरधामणा बॅरेज व नया अंदूरा प्रकल्पास सुप्रमा देण्याची कार्यवाही अंतिम टप्यात आहे. तसेच उमा बॅरेज व काटीपाटी प्रकल्पाचे सु.प्र.मा. प्रस्ताव क्षेत्रियस्तरावर सादरीकरणाच्या अंतिम टप्प्यात आहे.

(४) उक्त प्रकल्पांवर निधी खर्च होऊन प्रकल्प पूर्ण झाल्यावर पुढीलप्रमाणे प्रकल्पनिहाय जमीन सिंचनासाठी येणार आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | सिंचनाखाली येणारी जमीन (हे.) |
|---|---|---|
| १ | नेरधामणा | ६९५४ |
| २ | उमा बॅरेज | ५५१० |
| ३ | शहापूर बृहत | १३७३ |
| ४ | वाई संग्राहक | १०३६ |
| ५ | नया अंदूरा | १७९० |
| ६ | कवठा बॅरेज | १७२२ |
| ७ | काटीपाटी बॅरेज | १८०० |
| ८ | शहापूर ल.पा. | ३८० |

हिवरा संग्राहक व सुकळी प्रकल्प जवळपास पूर्ण झालेले असून अनुक्रमे ३७१ व ५२३ हेक्टर जमीन सिंचनाखाली आलेली आहे. कंचनपूर प्रकल्प रद्दसाठी प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही,

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निमगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे ग्रामीण रुग्णालयाचा बृहत आराखडा अंतिम करण्याबाबत

**(२२) * ३९४११ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७७६० ला दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जोड बृहत आराखडा तयार करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, निमगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची मर्यादा, निमगांव परिसरातील गांवे व लोकसंख्येतील वाढ तसेच सद्य:स्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्रातील कमी पडणाऱ्या सोयी-सुविधांचा विचार करता निमगांव येथे स्वतंत्र ग्रामीण रुग्णालय स्थापन करणेबाबतच्या मागणीचा अंतर्भाव प्रस्तुत जोड बृहत आराखड्यात करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणता निर्णय घेतला आहे व सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जोड बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाही.

सन २०११ च्या जनगणनेवर आधारीत जोड बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही अद्याप सुरू आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोठारी (जि.चंद्रपूर) येथील कन्या पारितोषिक योजनेचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(२३) * ३९५९३ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोठारी (जि.चंद्रपूर) येथील जिल्हापरिषदेच्या अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे शासनाच्या सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजनेंतर्गत गेल्या ६ वर्षापासून कन्या पारितोषिक योजनेचे प्रस्ताव वरिष्ठांकडे प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत ४८ लाभार्थ्यांना अनुदान प्राप्त झाले नसून या अनुदानास प्राप्त असलेल्या लाभार्थ्यांना अनुदान न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने लाभार्थ्यांना अनुदान मिळणेबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

एक पात्र प्रकरण जिल्हा शल्य चिकित्सकांच्या कार्यालयात प्रलंबित असल्याचे आढळून आले आहे.

(२) व (३) ४८ प्रकरणांपैकी ४७ प्रकरणे शस्त्रक्रियेनंतर ३ वर्षांच्या कालावधीनंतर लाभार्थ्यांनी सादर केल्याने शासन निर्णयातील तरतूदीनुसार अपात्र ठरल्याने अनुदान अनुज्ञेय नाही.

एका पात्र प्रकरणात अनुदान मंजूर न केल्याबाबत चौकशी करुन संबंधित जबाबदार आरोग्य सहाय्यकाविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत कंत्राटी वाहनचालकांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

**(२४) * ३९७६७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हा परिषदेकडील आरोग्य विभागांतर्गत सन २००४ पासून सुमारे ६७ प्राथमिक आरोग्य केंद्रात कंत्राटी तत्वावर वाहनचालक कार्यरत असून राज्यातील इतर बहुसंख्य जिल्हा परिषदेतील आरोग्य केंद्रामध्ये मोठ्या प्रमाणात कंत्राटी तत्वावर वाहनचालक कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यातील जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागात कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या उक्त वाहनचालकांना कोणत्याही प्रकारचे शासकीय लाभ मिळत नसल्याने त्यांच्यावर अन्याय होत असल्यामुळे त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे, अशी विनंती लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे लेखी पत्राद्वारे केली असून सदर पत्रासोबत अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा कंत्राटी वाहनचालक संघटना यांचे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २५/०८/२००५ रोजीच्या परिपत्रकामध्ये तात्पुरत्या कर्मचाऱ्यांना कायम करण्यात येऊ नये, असे निर्देश असल्याने कंत्राटी वाहन चालकांना सेवेत नियमित करण्याची मागणी मान्य करता येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगांव जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियानाची कामे पूर्ण करण्याबाबत

**(२५) * ४०२१४ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-१७ अंतर्गत करण्यात आलेली अनेक कामे अपूर्ण असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन सदर कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(३) तसेच जळगांव जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियान सन २०१७-१८ अंतर्गत करण्यात येणारी कामे वेळेवर पूर्ण करणेबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**प्रा. राम शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

जळगाव जिल्ह्यामध्ये जलयुक्त शिवार अभियान सन २०१६-१७ करीता प्रस्तावित ४८५६ कामांपैकी ४६९१ (९७ टक्के) कामे पूर्ण करण्यात आली आहेत. उर्वरित कामे मार्च, २०१८ अखेर पूर्ण करण्यात येतील.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) जळगांव जिल्ह्यातील सन २०१७-१८ अंतर्गत प्रस्तावित ४२४९ कामे मे, २०१८ अखेर पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## औरंगाबाद जिल्हा सामान्य रुग्णालयात औषधे कालबाह्य झाल्याबाबत

**(२६) * ४०४३६ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हा सामान्य रुग्णालयात कोट्यवधी रुपयांची औषधे कालबाह्य झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने औषध साठ्याचे विहित मुदतीत वाटप न करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

सामान्य रुग्णालय, औरंगाबाद येथील औषधी भांडारातील रुपये १२,५९,४०३/- एवढ्या रकमेची औषधे कालबाह्य झाल्याचे चौकशी समितीस आढळून आले आहे.

(२) होय.

चौकशी करण्यात आली असून चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार संबंधितांवर नियमानुसार कारवाई प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना जाहीर करुन कर्जमाफीची रक्कम देण्याबाबत

**(२७) * ४०४६५ श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना जाहीर करुन कर्जमाफीची रक्कम देण्यासाठी शासनाने ठाणे जिल्ह्याच्या विकास निधीत गेल्या वर्षीच्या रुपये ३०६ कोटीऐवजी यावर्षी रुपये २३० कोटी म्हणजे सुमारे ७५ टक्के कपात करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदेकडून घोषित करण्यात आलेल्या अनेक महत्वाच्या योजना प्रत्यक्षात येऊ शकल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जिल्ह्याच्या विकास निधीत वाढ करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) नाही. तथापि, सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात वेळोवेळी अर्थसंकल्पीत केलेला निधी (आमदार स्थानिक विकास कार्यक्रम तसेच केंद्र पुरस्कृत योजनेचा व त्यानुरुप राज्य हिश्श्याचा निधी वगळता), महसूली ७०% व भांडवली ८०% या मर्यादेत वितरीत करण्याच्या सूचना दिनांक ३०/०६/२०१७ च्या परिपत्रकान्वये संबंधित प्रशासकीय विभागांना देण्यात आल्या होत्या. मात्र, दिनांक ०१/०२/२०१८ च्या परिपत्रकान्वये जिल्हा वार्षिक योजनांच्या (सर्वसाधारण/अनुसूचित जाती घटक/अनुसूचित जमाती घटक योजना) १००% तरतूदी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कर्जत तालुक्यात (जि.रायगड) कुपोषित बालके आढळून आल्याबाबत

**(२८) * ४०४९२ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात सार्वजनिक आरोग्य विभाग व महिला बालविकास विभागाने या महिन्याच्या सुरुवातीला केलेल्या सर्वेक्षणात जिल्ह्यातील १५ तालुक्यात १९६ तीव्र कुपोषित बालके आढळून आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वेक्षणानुसार सर्वाधिक कर्जत तालुक्यात ५३ बालके तीव्र कुपोषित असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) संपूर्ण जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांनी वयानुसार वजन हे निकष वापरुन संपूर्ण जिल्ह्यातील बालकांचे वर्गीकरण करुन जिल्ह्यातील १५ प्रकल्पात १९६ तीव्र कुपोषित बालके आढळून आली आहेत.

सदर ठिकाणी जिल्हा नियोजन समिती यांचे माध्यमातून रुपये १०.०० लक्ष इतका निधी प्राप्त झाला आहे. सदर निधीतून वैद्यकीय बाल उपचार केंद्र (Child Treatment Center) १ व ९१ ग्राम बाल उपचार केंद्र (VCDC) सुरु करण्यात आली असून कुपोषित बालकांना आरोग्य तज्ञांच्या सल्ल्यानुसार औषधे व पूरक पोषण आहार देण्यात येत आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत असलेल्या अंगणवाडीतील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील लाभार्थी, गर्भवती स्तनदा माता, तीव्र कमी वजनाची मुले यांना THR व ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील लाभार्थ्यांना स्थानिक महिला मंडळे व बचतगट यांचेमार्फत गरम ताजा आहाराचा पुरवठा करण्यात येत आहे.

ग्रामीण, शहरी, आदिवासी क्षेत्रातील लहान बालकांच्या कुपोषणावर प्रभावीपणे मात करण्यासाठी ग्राम बाल विकास केंद्र (VCDC) योजना सुरु करण्याबाबत प्रशिक्षण व सर्वेक्षण सुरु करण्यात आले आहे.

भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर महिला व स्तनदा माता यांना एक वेळचे संपूर्ण जेवण तसेच बालकांना अंडी, दूध व केळी असा पूरक आहार देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान अखर्चित राहिल्याबाबत

**(२९) * ४०६१३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३६४२७ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी केंद्र शासनाच्या तेराव्या वित्त आयोगामार्फत प्राप्त झालेले सुमारे ५२३२.४३ लाख अनुदान रकमेपैकी केवळ रुपये ६८३.०५ लक्ष इतकाच खर्च झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौदाव्या वित्त आयोगाचा कार्यकाळ पूर्ण होत असताना तेराव्या वित्त आयोगाने दिलेल्या अनुदानापैकी रक्कम रुपये ४५४९.३८ लक्ष इतक्या मोठ्या प्रमाणात अनुदान रक्कम शिल्लक राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शिल्लक राहिलेली रक्कम सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात खर्च करण्याबाबत कोणते नियोजन केले आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

दिनांक २८/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ५२३२.४३ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी रुपये ६९५.०४ लक्ष इतकी रक्कम खर्च झाली असून उर्वरीत निधीच्या विनियोगाची कार्यवाही सुरु आहे.

सदर रक्कम इमारती बांधकामे/नूतनीकरण करण्यासंदर्भात खर्च करावयाची असून, यापैकी काही कामे प्रगती पथावर आहेत, काही कामांची निविदा प्रक्रिया सुरु आहे व काही कामांची तांत्रिक मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) सदर कामे सन २०१७-१८ व सन २०१८-१९ मध्ये पूर्ण करण्याचे व निधी खर्च करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

-----------------

## राज्यात कुपोषणामुळे बालकांचा मृत्यू झाल्याबाबत

**(३०) * ४०६५० श्री.नागोराव गाणार** : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मेळघाट, नंदुरबार, पालघर, गडचिरोली येथे कुपोषणाचे प्रमाण अधिक असून मेळघाटच्या कुपोषणाचे लोण नागपूर जिल्ह्यात पोहोचले असल्याने वर्षभरात ० ते १ वर्ष वयोगटातील २३९ अर्भकांचा तर ३३२ बालकांचा मृत्यू झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुपोषण कमी करण्यासाठी अंगणवाडी योजना सुरु केली मात्र यासाठी दरवर्षी वाढीव निधीची आवश्यकता असतानाही त्याप्रमाणात योजनेस निधी उपलब्ध केले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जन्मापासून २८ दिवसांच्या आत जिल्ह्यातील २१ बालके दगावली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत पोषण आहारासाठी ५०% केंद्र व ५०% राज्य हिस्सा या प्रमाणात निधी उपलब्ध होतो. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी रुपये १२३६ कोटीचा निधीकरीता प्रस्ताव (APIP) सादर करण्यात आला तसेच रुपये २७९ कोटी इतक्या थकीत देयकांकरिता अतिरिक्त मागणी केंद्र शासनाकडे करण्यात आली होती. तथापि, केंद्र शासनाने रुपये ९९४/- कोटीचा इतक्या निधीचा प्रस्ताव मंजूर केला आहे. मंजूर APIP च्या तुलनेत राज्य शासनाने हिवाळी अधिवेशनापूर्वी रुपये ५९४/- कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला होता मात्र प्रलंबित देयकांची संख्या विचारात घेता हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीन्वये रुपये ४००/- कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून यातून प्रलंबित देयके अदा करण्यात येत आहेत.

(३) होय.

(४) अंगणवाडीस्तरावर अंगणवाडी सेविका बालकांचे वयानुसार वजन हे निकष लावून बालकांची सर्वसाधारण, मध्यम तीव्र कुपोषित अशी वर्गवारी करुन जी बालके कुपोषित आढळून येतात त्यांना अतिरिक्त आहार देण्यात येतो. तसेच आवश्यकतेनुसार कुपोषित बालकांना वैद्यकीय उपचार व औषधोपचार करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरगुडा, ग्रामपंचायत अंबाजी तांडा (ता.किनवट, जि.नांदेड) येथील ग्रामस्थांच्या मागण्याबाबत

**(३१) * ४०७२७ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजी तांडा (ता.किनवट, जि.नांदेड) ग्रामपंचायत अंतर्गत संपूर्ण आदिवासींची वस्ती असलेल्या व पेसा योजनेंतर्गत येणाऱ्या वरगुडा, शिवराम खेडा या गावांना विविध योजनांसाठी शासनाचा निधी उपलब्ध असतानाही

प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रस्ते, वीज, पाणी, सामुहिक वनहक्क दावे, वैयक्तिक दावे इत्यादी सुविधा मिळत नसल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे येथील आदिवासींनी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्व संध्येला सहकुटुंब प्राणांतिक उपोषणाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरील गावांत शासनाने रस्ते, वीज, पाणी, रोजगार, सामुहिक वनहक्क इ. समस्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) मौ.वरगुडा, ग्रामपंचायत अंबाडी तांडा, जि.नांदेड येथील ग्रामस्थांनी रस्ते, वीज, पाणी, सामुहिक वनहक्क दावे व वैयक्तिक दावे या मागण्या पूर्ण न झाल्यास दिनांक २५/०१/२०१८ पासून उपोषण करण्याबाबत सहायक जिल्हाधिकारी, किनवट, जि.नांदेड यांना निवेदन दिले होते.

(३) प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीनुसार शिवराम खेडा या गावाला जोडणारा रस्ता आहे व गावा अंतर्गतही रस्ते उपलब्ध आहेत तसेच वीज उपलब्ध आहे. पाणीपुरवठा नळ योजनेद्वारे चालू आहे. दोन हातपंपही चालू आहेत. पेसा योजनेच्या निधीतून शाळा डिजीटल करण्यात आली आहे.

वरगुडा गावास १ कि.मी. लांबीचा रस्ता झाला आहे. पुढे राखीव वनक्षेत्र असल्यामुळे अंदाजे दिड कि.मी. चा रस्ता उपलब्ध नाही. तसेच सदर गावा अंतर्गत रस्ते व वीज उपलब्ध आहे. ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत पाणीपुरवठा नवीन विहिरींचे काम चालू आहे. विहिर ते गावापर्यंत पाईपलाईनचे काम पूर्ण करण्यात आले आहे. याअगोदर उपलब्ध असलेल्या जुन्या विहिरीवरुन पाणीपुरवठा चालू आहे. सद्य:स्थितीत पाणी कमी असल्याने गावातील श्री.किशन शंकर मेश्राम यांची विहिर अधिग्रहीत केली असून त्यावरुन सद्य:स्थितीत पाणीपुरवठा चालू आहे. सदर गावासाठी एक हातपंप पेसा निधीतून मंजूर केला असून हातपंप बसविण्याची कार्यवाही ग्रामपंचायतीकडून करण्यात येत आहे.

अनुसूचित जमाती व इतर वननिवासी (वनहक्क मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारीत नियम २०१२ चे कलम ३(१) नुसार अंबाडी तांडा ग्रामपंचायत अंतर्गत वैयक्तिक वनहक्काचे एकूण ८२ दावे प्राप्त झाले होते. त्यापैकी ४१ दावे मंजूर झाले असून सदरील दावेदारांची नोंद शासन सुचनेनुसार ७/१२ च्या इतर हक्कात नोंदविण्यात आली आहे. उर्वरीत ४१ दावे उपविभागस्तरीय समितीने नामंजूर केले आहेत. सदरचे नामंजूर दावे फेरतपासणीसाठी उपविभागीयस्तरीय समितीची बैठक दिनांक १३/३/२०१८ रोजी आयोजित केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती उपोषणकर्त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली व त्यांचे समाधान झाल्याने दिनांक २५/१/२०१८ रोजीच उपोषण मागे घेतले आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सुधागड पाली (जि.रायगड) येथील शासकीय आरोग्य केंद्रात प्रसूतीसाठी आलेल्या महिलेचा उपचार थांबविल्याबाबत

**(३२) * ४०८७१ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुधागड पाली (जि.रायगड) येथील प्रसूतीसाठी आलेल्या महिलेला शासकीय आरोग्य केंद्रात एचआयव्ही पॉझिटीव्ह जाहीर करून तिच्यावर उपचार करण्याचे थांबविले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर रमेश भगत यांनी चुकीचा सल्ला देवून निष्काळजीपणामुळे आदिवासी महिलेला नाहक मानसिक त्रास दिला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महिलेस एचआयव्ही नसल्याचे निष्पन्न होवून सुखरूप बाळंतीण झाल्याने तेथील आदिवासी समाजामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित डॉक्टर रमेश भगत यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत** : (१) व (२) हे खरे नाही.

सदर केंद्रात HIV निश्चिती निदानाची सोय नसल्याने तसेच सेफ डिलीव्हरी किटचा साठा संपल्याने सदर महिलेस पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालय अलिबाग येथे सोयी सुविधा असल्याने संदर्भीत करण्यात आले.
(३) हे खरे नाही

सदर महिलेची HIV कन्फरमेटरी तपासणी (Confirmatory Test) नंतर निदान करणे आवश्यक होते.
(४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून निष्काळजीपणा केलेल्या संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती समाप्त करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्राथमिक आरोग्य केंद्र, तारापुर (ता.जि.पालघर) येथील नविन इमारत बांधणेकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३३) * ४०९२६ श्री.रविंद्र फाटक** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्राथमिक आरोग्य केंद्र, तारापुर (ता.जि.पालघर) येथील इमारत व कर्मचारी निवासस्थानामध्ये दरवर्षी अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी साचत असल्याने इमारतीचा पाया कमकुवत झाला असून सदर इमारतीसाठी भराव करुन पुनर्बांधणी करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनुदान मंजूर करण्याबाबत संबंधित विभागाकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने इमारत बांधण्याकरिता निधी उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय हे खरे आहे.

(२) प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत वापरण्यास अयोग्य असल्याने सदर इमारत पाडून त्याठिकाणी नवीन इमारत बांधण्याबाबत तसेच सदर इमारतीचे बांधकाम राष्ट्रीय आरोग्य अभियानामार्फत करण्याबाबतच्या ठरावास जिल्हा परिषद, पालघर आरोग्य समिती यांनी त्याच्या दिनांक १४/०३/२०१७ व दिनांक २८/०२/२०१८ रोजी झालेल्या सभेत मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याची कार्यवाही जिल्हा परिषद, पालघर यांच्या मार्फत सुरु आहे. सदर अंदाजपत्रक व आराखडे प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात दिव्यांगांसाठी राखून ठेवलेला निधी अखर्चित ठेवल्याबाबत

**(३४) * ४०९६३ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिव्यांगाच्या कल्याणाकरिता राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनांपैकी जिल्हा परिषद व पंचायत समिती यांना मिळणाऱ्या निधीपैकी ३ टक्के निधी दिव्यांगासाठी राखीव ठेवण्यात आला असून राज्यातील काही जिल्हा परिषद व पंचायत समित्या या राखीव निधी खर्च करत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दिव्यांगासाठी असलेला निधी खर्च न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय.

(३) दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ च्या शासन परिपत्रकान्वये दिव्यांगांसाठी राखून ठेवलेला निधी पूर्णपणे खर्च करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

दिव्यांगांसाठी राखून ठेवण्यात आलेला निधी काही अपरिहार्य कारणास्तव त्या-त्या वर्षात खर्च होऊ शकला नाही, तर सदर अखर्चित निधी अपंग कल्याण निधीमध्ये जमा करण्यात येऊन खर्च करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच निधी खर्च न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## मौजे धामापूर (खालचावाडा) ते आंबेरी रस्त्याच्या मजबूतीकरणाबाबत

**(३५) * ४०९८५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे धामापूर (खालचावाडा) ते आंबेरी ग्रा.मा. ४०२ या ३.५० कि.मी. पैकी ०/०० ते १/५००, १/८०० ते ३/०० व आंबेरी-बावखोल मार्गे ग्रा.मा. ४०८ या ५.८०० कि.मी. पैकी ०/०० ते ०/२०० या दुरवस्था झालेल्या रस्त्याच्या मजबूतीकरणासह डांबरीकरणाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(२) असल्यास, उपरोक्त संपूर्ण रस्त्याच्या रुंदीकरणासह मजबूतीकरण व डांबरीकरणाच्या कामासाठी माहे जानेवारी, २०१८ अखेर किती निधी उपलब्ध करुन दिला आहे व त्यापैकी किती निधी आतापर्यंत खर्च झाला आहे.

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संपूर्ण रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पूर्ण करुन एस.टी. वाहतूक सुरु करुन देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) मौजे धामापूर (खालचावाडा) ते आंबेरी ग्रा.मा. ४०२ या ३.५० कि.मी. पैकी ०.७०० कि.मी. व आबेरी-बावखोल मार्गे ग्रा.मा. ४०८ या ५.८०० कि.मी. पैकी सर्व ५.८०० कि.मी. अशी एकुण ६.५०० कि.मी. रस्ता दर्जोन्नतीसाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूरी प्राप्त आहे.

ग्रा.मा. ४०२ ची उर्वरीत लांबी बांधकाम विभाग जि.प. सिंधुदुर्गच्या ताब्यात असून रस्ते विशेष दुरुस्तीच्या निधीमधून निधीच्या उपलब्धतेनुसार सदर लांबीवर काम करण्यात येणार आहे.

(२) ग्रा.मा.४०२ च्या ०.७०० कि.मी. तसेच ग्रा.मा.४०८ च्या ५.८०० कि.मी. अशी एकूण ६.५०० कि.मी. रस्त्याच्या मजबूतीकरण व डांबरीकरणासाठी एकूण रुपये ४३०.३५ लक्ष इतके अनुदान मंजूर असून सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर आहे. या रस्त्यावर आतापर्यंत खर्च निरंक आहे.

(३) सद्य:स्थितीत या रस्त्यावर मातीकाम, मोऱ्या बांधकाम करणे, संरक्षक भिंत बांधण्याचे काम प्रगतीत असून मुदतीत काम पूर्ण करुन घेण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हैसाळ (ता.मिरज, जि.सांगली) येथील स्त्रीभ्रूण हत्या प्रकरणाच्या चौकशी समितीबाबत

**(३६) * ४०९९५ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हैसाळ (ता.मिरज, जि.सांगली) येथील डॉ.बाबासाहेब खिद्रापुरे यांनी केलेल्या स्त्रीभ्रूण हत्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी मिरज येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ.पल्लवी सापळे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे काय, असल्यास, केव्हा तसेच सदर अहवालात समितीने कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत व त्यापैकी कोणत्या शिफारशी शासनाने मान्य केल्या आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने डॉ.बाबासाहेब खिद्रापुरे यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

शासनास दिनांक २५/०७/२०१७ रोजी अहवाल प्राप्त झाला आहे. समितीने अनेक शिफारशी केल्या असून खालील शिफारशीनुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

१. सदर डॉक्टरची नोंदणी रद्द करणेबाबत महाराष्ट्र होमिओपॅथीक परिषदेला कळविले.
२. M.T.P. कायद्यात सुधारणेची शिफारस केंद्र शासनास केली आहे.
३. सर्व पालकमंत्री व लोकप्रतिनिधींना त्यांच्या प्रभागातील कामाच्या आढाव्यात स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तर प्रमाणाची नोंद घेण्याचे कळविले आहे.
४. मुलींच्या जन्मदरात वाढ होण्यासाठी व त्यांचे शिक्षण व्हावे यास्तव माझी कन्या भाग्यश्री ही सुधारीत योजना १ ऑगस्ट, २०१७ पासून कार्यान्वित केली आहे.

इतर शिफारशी धोरणात्मक असल्याने शासनस्तरावर विचाराधीन आहेत.

(३) होय.

संबंधित दोषी डॉक्टरना अटक करुन त्यांचेविरुध्द मिरज ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल गुन्हयासंदर्भात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३७) * ३८०२८ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीक्षेत्र नारायणगड (जि.बीड) संस्थानच्या विकास आराखड्यासंदर्भात दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होवून विकास आराखड्यास अंतिम मंजूरी देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीक्षेत्र नारायणगड संस्थान येथे आमदार/खासदार स्थानिक विकास निधी कार्यक्रमातून वेळोवेळी प्रस्तावित करण्यात आलेल्या कामांचे अंदाजपत्रक तयार करणे वा त्यास प्रशासकीय मान्यता देण्याच्या प्रक्रियेस मोठा विलंब झाला असून याबाबत संबंधित लोकप्रतिनिधींना प्रशासनाने अवगत केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्य:स्थितीत श्रीक्षेत्र नारायणगड संस्थान येथे मागील पाच वर्षात लोकप्रतिनिधींनी किती व कोणकोणती कामे प्रस्तावित केली, जिल्हाधिकारी (नियोजन) यांनी संबंधित विभागास अंदाजपत्रक सादर करण्याचे निर्देश दिल्यानंतर संबंधित विभागाने याबाबतचे प्रस्ताव योग्य त्या मान्यतेसाठी सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, आमदार/खासदार यांनी त्यांच्या निधीतून प्रस्तावित केलेली कामे प्रत्यक्षात झाली नसल्यास, दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच बीड जिल्ह्यातील कोणकोणत्या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी शासनाने विकास आराखडे तयार करण्याचे प्रस्तावित केले आहे, त्याचा तपशील काय आहे,

(६) सन २०१४ पासून बीड जिल्ह्यातील कोणकोणत्या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी शासनाने निधी मंजूर केला, प्रस्तावित निधीमधून विकास कामे पूर्ण झाली आहेत काय, त्याचा तपशील काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) व (३) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७/३/२०१५ च्या पत्रान्वये, पौंडूळ, ता.शिरूर येथे श्रीक्षेत्र नारायणगड जवळ सार्वजनिक जागेवर सांस्कृतिक सभागृह बांधकाम (अंदाजित रक्कम रुपये १९.९९ लक्ष) हे काम सुचविले होते. सदर कामास दिनांक १०/०६/२०१५ च्या पत्रान्वये प्रशासकीय मान्यता दिली असून सद्य:स्थितीत काम पूर्ण झाले आहे.

तसेच सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४/५/२०१६ च्या पत्रान्वये, श्रीक्षेत्र नारायणगड येथे सामाजिक सभागृह बांधकाम (अंदाजित रक्कम रुपये १०.०० लक्ष) हे काम सुचविले होते. त्यानुसार जिल्हा नियोजन अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक २७/५/२०१६ च्या पत्रान्वये सदर कामाचे अंदाजपत्रक पाठविण्याबाबत कळविले होते. तथापि सदर अंदाजपत्रक अद्याप प्राप्त झाले नाही.

(४) सन २०१६-१७ मधील सामाजिक सभागृह बांधकामाचे अंदाजपत्रक प्राप्त न झाल्यामुळे काम मंजूर झाले नाही. त्यामुळे याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून खुलासा घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) बीड जिल्ह्यातील श्रीक्षेत्र रामेश्वर मंदिर, सौताडा, ता.पाटोदा, श्रीक्षेत्र ज्ञानेश्वर माऊली संस्थान, बोरी पिंपळगाव, ता.गेवराई, काशेश्वरी देवी देवस्थान, पोथरा मुर्शदपूर, ता.बीड, खंडेश्वर देवस्थान, कुसळंब, ता.पाटोदा व भालचंद्र गणपती लिंबागणेश, ता.बीड या तीर्थक्षेत्रांचे विकास आराखडे संबंधित उप अभियंता यांच्याकडून मागविण्यात आले आहेत.

(६) शासनाने बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र मंगलमूर्ती देवस्थान, राजुरी (न) व श्रीक्षेत्र नारायणगड येथे विकासकामांसाठी निधी वितरीत केला असून तेथील कामे पूर्ण झाली आहेत. तसेच श्रीक्षेत्र अश्वलिंग महाराज मंदिर, पिंपळवंडी, ता.पाटोदा, श्रीक्षेत्र बंकटस्वामी मठ संस्थान, नेकनूर, ता.बीड, श्रीक्षेत्र तारकेश्वर गड महिंदा, ता.आष्टी व श्रीक्षेत्र संत मीराबाई गुरू भगवान संस्थान, महासांगवी, ता.पाटोदा या तीर्थक्षेत्रांना निधी मंजूर केला असून येथील कामे प्रगतीपथावर आहेत.

तसेच मोठ्या आराखड्यांतर्गत श्रीक्षेत्र मन्मथस्वामी देवस्थान, कपीलधार, ता.बीड या तीर्थक्षेत्राच्या विकासास्तव रुपये १०.०० कोटी ठोक तरतूद करण्यात आली असून आराखड्यास पुढील विहीत मान्यता घेण्यात येत आहे. तसेच श्रीक्षेत्र नारायणगड व श्रीक्षेत्र गहिनीनाथगड या तीर्थक्षेत्रांना प्रत्येकी रुपये २५.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला असून प्रत्येकी रुपये २.०० कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

-----------------

## नवेदर नवगाव (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत निवडून आलेल्या अनुसूचित जमातीच्या सदस्यांचे दाखले रद्द केल्याबाबत

**(३८) * ३९८८९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवेदर नवगाव (ता.अलिबाग, जि.रायगड) ग्रामपंचायतीच्या सन २००७ साली झालेल्या निवडणुकीत निवडून आलेल्या ८ अनुसूचित जमातीच्या सदस्यांचे दाखले रद्द करण्यात आले असून तेथील ग्रामपंचायत निवडणुकीवर सर्व ग्रामस्थांनी बहिष्कार टाकला असल्याने सदर ग्रामपंचायतीवर दिनांक १८ मे, २०१० रोजीपासून प्रशासक नेमण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समाजातील व्यक्तीला जातीचा दाखला मिळविण्यासाठी तसेच जातपडताळणीसाठी सन १९५० पूर्वीचा पुरावा व काही जाचक अटींमुळे जातपडताळणी कार्यालयाकडून या जातीच्या दाखल्याला वैधता प्रमाणपत्र मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन १९५० पूर्वी या समाजातील व्यक्ती अशिक्षित असल्यामुळे त्यांना ५० वर्षापूर्वीचा पुरावा सादर करता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी जाहीर झालेल्या नवेदर नवगाव ग्रामपंचायतीच्या उमेदवारांची एकूण संख्या ही ११ असून त्यापैकी अनुसूचित जमातीचे ७ उमेदवारांचे प्रभागनिहाय आरक्षण जाहीर करण्यात आले आहे तसेच हिच परिस्थिती अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) कोप्रोली ग्रामपंचायतीची आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, कोकण विभाग, ठाणे यांच्याकडे एकूण ७ अर्जदारांचे (सदस्यांचे) प्रमाणपत्र तपासणीचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी ५ अर्जदारांचे जात प्रमाणपत्र तपासणी समितीने अवैध घोषित केले असून २ अर्जदारांचे जात प्रमाणपत्र तपासणी समितीकडून अन्य कारणास्तव रद्द व जप्त करण्यात आले होते. त्यामुळे दिनांक १८ मे, २०१० रोजी सदर ग्रामपंचायतीवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(२) व (३) अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ मधील नियम ३(३) नुसार उमेदवाराने कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. या नियमात नमूद केलेली कागदपत्रे व पुरावे सादर करणाऱ्या व्यक्तीस/अर्जदारास अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळते. त्यामध्ये अनुसूचित जमातीच्या अधिसूचनेच्या दिनांकापूर्वी अनुसूचित जमातीबाबत आणि निवासाच्या सर्वसाधारण ठिकाणाबाबतचा लेखी पुरावा सादर करणे समाविष्ट आहे. परंतु याबाबत नियम ३(४) मध्ये, "अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जदार कोणताही एक किंवा अनेक दस्तऐवज सादर करण्यास असमर्थ असेल तर अर्जदाराने त्याबाबतची कारणे नमूद करुन सक्षम अधिकाऱ्यास शपथपत्र सादर करावयाचे आहे. त्या शपथपत्रावर सक्षम प्राधिकाऱ्याने विचार करुन तसेच योग्य चौकशी करुन गुणावगुणांवरुन (on merit) दाव्याचा निर्णय घ्यावा अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ मधील नियम ११(२) मध्ये जात पडताळणी समितीला प्रमाणपत्र तपासणीसाठी सादर करावयाची कागदपत्रे नमूद केलेली आहेत, तो सादर करणाऱ्या व्यक्तीस/अर्जदारास अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र मिळते.

(४) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम १० मधील पोट-कलम (२) मधील खंड (ब) तसेच मुंबई ग्रामपंचायत (सदस्य संख्या, प्रभाग रचना आणि जागांचे आरक्षण) नियम, १९६६ मधील नियम-४ अन्वये सन २०११ च्या जनगणनेनुसार नवेदर नवगाव ग्रामपंचायती मध्ये एकूण ११ सदस्यांपैकी ७ जागा व कोप्रोली ग्रामपंचायतीमध्ये एकूण ९ सदस्यांपैकी ७ जागा अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता आरक्षित होतात.
(५) वरील प्रमाणे कायदेशीर वस्तुस्थिती असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लेंडी (जि.पालघर) धरणग्रस्तांचे पुनर्वसन करुन मोबदला देण्याबाबत

**(३९) * ४०९८४ श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३४२०२ ला दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लेंडी (जि.पालघर) धरणासाठी शासनाने शेतकऱ्यांकडून १८० हेक्टर जमीन संपादित न करता सदर धरणाचे काम पूर्ण केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लेंडी धरणग्रस्तांनी याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने मा.मंत्री मदत व पुनर्वसन यांनी यासंदर्भात बैठक घेऊन प्रकल्पग्रस्तांना त्वरित मोबदला देण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(४) तसेच या धरणाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदारास शासनाने शेतकऱ्यांचे पुनर्वसन न करता रक्कम अदा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करुन जमिनीचा मोबदला अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) लेंडी धरणासाठी आवश्यक असलेल्या १७२.०६.५० हेक्टर जमिनीपैकी ५.९८.२ हेक्टर जमीन ताब्यात आली आहे. धरणाच्या बुडीत क्षेत्रातील लोकांची लेखी संमतीपत्रे घेऊन जानेवारी, २००८ दरम्यान प्रत्यक्ष धरणाच्या कामास सुरूवात करण्यात आली आहे. अदयाप धरणाची घळभरणी झालेली नाही. प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे लेंडी धरणाचे काम सन २०११ पासून बंद ठेवण्यात आले आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) अंशत: खरे आहे.

धरणाच्या प्रत्यक्ष झालेल्या कामाची रक्कम ठेकेदारास अदा करण्यात आली आहे. प्रकल्पग्रस्तांचे हिरडपाडा येथील भोतडपाडयासाठी शासकीय पुनर्वसन प्रस्तावित असून, जव्हार या तालुक्याच्या जवळ भरसटमेट येथील जागेस पसंती दिली आहे. पुनर्वसनासाठी ६.९६ हेक्टर व प्रकल्पासाठी १६६.०८.३ हेक्टर जमिनीचे भूसंपादन सन २०१३ च्या नवीन भूसंपादन कायदयानुसार व महसूल व वन विभाग यांच्या दिनांक १२/०५/२०१५ च्या शासन निर्णयानुसार खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने करण्याची कार्यवाही करण्यात येत असून जमिनीचा ताबा मिळाल्यानंतर नगर रचना विभागाकडून नियोजित आराखडा प्राप्त करून नागरी सुविधांची सर्व कामे तातडीने पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## झरी-जामडी तालुक्यात (जि.यवतमाळ) रिलायन्स सिमेंट प्रकल्प उभारण्यात येणार असल्याबाबत

**(४०) * ४०४०७ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरी-जामडी तालुक्यात (जि.यवतमाळ) रिलायन्स सिमेंट प्रकल्प उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी राखीव वनजमीन प्रकल्पाला देण्यात आली असून वन जमीन संवर्धन कायदयाचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पर्यावरण संतुलनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) केंद्रिय पर्यावरण, वने व जलवायू परिवर्तन मंत्रालयाने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम २ अन्वये यवतमाळ जिल्हयातील झरी जामडी तालुक्यामधील ४६७.४५ हे. राखीव वनजमीन मे.रिलायन्स सिमेंटेशन प्रा.लि. यांना सिमेंट प्रकल्पासाठी वळती करण्यास दिनांक १२/०९/२०१७ रोजी अंतिम मान्यता प्रदान केली आहे. केंद्र शासनाच्या आदेशातील अटीपूर्ततेनंतर राज्य शासनाने दिनांक २२/०१/२०१८ रोजी सदर प्रकल्पाकरीता वनक्षेत्र वळतीकरणाचे औपचारिक आदेश निर्गमित केले आहेत. वन (संवर्धन) अधिनियम, १९८० मधील तरतुदीस अनुसरून सदर क्षेत्र वळती करण्यात आल्याने वन (संवर्धन) कायद्याचे उल्लंघन झालेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील शेतकऱ्यांना अवजाराचे वाटप करण्याबाबत

**(४१) * ४०३५४ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयात सन २०१७-१८ या वर्षासाठी शेतकऱ्यांना अवजाराचे वाटप करण्यासाठी सेस फंडातून कृषी विभागासाठी रुपये ४ कोटी ८० लाख व जिल्हा नियोजन समितीतून रुपये ३५ लाख याप्रमाणे रुपये ५ कोटी १५ लाखांची आर्थिक तरतूद करण्यात येऊनही शेतकऱ्यांना अवजाराचे वाटप करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना अवजारांचे वाटप करण्याकरीता आर्थिक तरतूद करण्याबाबत तसेच आर्थिक तरतूद असतानाही शेतकऱ्यांना अवजाराचे वाटप करण्यास दुर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे : (**१) अंशत: खरे आहे.
(२) कृषी समिती, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी एकूण ४२७३ शेतकऱ्यांची निवड केली असून सदर अनुदानाचे वाटप थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रकियेनुसार करण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच जिल्हा नियोजन समितीमार्फत रुपये ५०.०० लाखाचे सौर पथदिवे खरेदी करीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असून पुरवठा आदेश देण्याची कार्यवाही मार्च, २०१८ अखेर पूर्ण करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## राज्यात एचआयव्हीग्रस्त रुग्णांना शासनाकडून मिळणारी आर्थिक मदत कमी पडत असल्याबाबत

**(४२) * ३८०१२ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एचआयव्ही बाधित रुग्णांची संख्या सुमारे २ लाख ५१ हजार ८४८ इतकी झाली असून या रुग्णांवर उपचार करण्यासाठी शासनाकडून मिळणारी आर्थिक मदत कमी पडत असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी नेटवर्क ऑफ महाराष्ट्र बाय पिपल लिव्हिंग विथ एचआयव्ही एड्स संस्थेचे निमंत्रक श्री.प्रशांत शेंडे यांनी मुंबई मराठी पत्रकार संघ, मुंबई येथे निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू संस्था मागील १६ ते १७ वर्षापासून एड्स नियंत्रणाचे काम करत असताना सन १९८० पासून शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळविण्यासाठी रुग्णांच्या वार्षिक उत्पन्नाचा सरकारी निकष रुपये २१,०००/- असल्याने अनेक रुग्णांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील रुग्णांना शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी रुपये २१०००/- वार्षिक उत्पन्नाचा निकष बदलून तो किमान एक लाख रुपये करावा अशीही मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील रुग्णांना शासकीय योजनांचा लाभ मिळून त्यांचे आरोग्य व्यवस्थित राहण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

राज्यात एकूण २,३९,०१४ रुग्ण ए.आर.टी. केंद्रातून उपचार घेत आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे. अनेक लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न निकषापेक्षा जास्त असल्याकारणाने लाभार्थ्यांना योजनांचा लाभ घेता येत नाही.

(३) हे खरे आहे.

(४) मराएनिसंमार्फत सर्व एचआयव्हीग्रस्त रुग्णांना योग्य ती शासकीय मदत मिळवून देण्यासाठी जिल्हास्तरावर एआरटी केंद्र व जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष या पातळीवर “एक खिडकी योजना” कार्यान्वित असून त्यामार्फत लाभ मिळवून देण्यासाठी स्थानिक पातळीवर पाठपुरावा केला जातो.

(५) विलंबाचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## चौधरवाडी (पो.सर्कलवाडी) (ता.कोरेगांव, जि.सातारा) गावातील रस्ते व गटाराची दुरुस्ती करण्याबाबत

**(४३) * ४०२८२ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चौधरवाडी (पो.सर्कलवाडी) (ता.कोरेगांव, जि.सातारा) फाटा ते गावात जाण्याकरिता हनुमान मंदिरापर्यंत तसेच गावातील अंतर्गत रस्त्यांची व गटाराची दुरवस्था झाली असून स्थानिकांची गैरसोय होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौधरवाडी जोडरस्ता ग्रामीण मार्ग क्र. १७ रस्त्याची लांबी १.२०० कि.मी., तसेच चौधरवाडी ग्रामपंचायत अंतर्गत रस्त्यांची लांबी २.५ ते ३.०० कि.मी. असून या दोन्ही रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक असूनदेखील अद्याप शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच चौधरवाडी फाटापासून ते गावात सौर पथदिवे, पथदिवे कमी असल्याने रात्रीच्या वेळी स्थानिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्यांचे खडीकरण, डांबरीकरण, गटाराची दुरुस्ती, सौर पथदिवे व पथदिवे लावणे प्राथम्यक्रमाने करणेबाबत व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व उक्त कामे कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

चौधरवाडी जोडरस्ता ग्रामीण मार्ग क्र.१७ असून सदर रस्त्याची एकूण लांबी १.२०० कि.मी. आहे. या रस्त्याचा पृष्ठभाग डांबरी असून रस्त्याच्या दुरुस्तीची कामे करणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्राथम्यक्रमानुसार सदर रस्त्याच्या दुरुस्तीची कामे प्रस्तावित करण्यात येत आहे.

ग्रामपंचायत अंतर्गत रस्ते अंदाजे २.५ ते ३.० कि.मी. असून निधीच्या उपलब्धतेनुसार रस्त्यांची कामे टप्प्याटप्प्याने करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) होय, हे खरे आहे.

चौधरवाडी फाटापासून ते गावापर्यंतच्या रस्त्यावर सद्य:स्थितीत पथदिवे नाहीत. मात्र, चौधरवाडी गावामध्ये एकूण ७ ठिकाणी पथदिवे बसविण्यात आले आहेत.

(४) व (५) चौधरवाडी जोडरस्ता ग्रामीण मार्ग क्र. १७ या रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्राथम्यक्रमानुसार सदर रस्त्याचे काम प्रस्तावित करण्यात येत आहे.

ग्रामपंचायत अंतर्गत रस्ते अंदाजे २.५ ते ३.० कि.मी. असून निधीच्या उपलब्धतेनुसार रस्त्यांची कामे टप्प्याटप्प्याने करण्याचे ग्रामपंचायतीचे प्रयत्न आहेत.

तसेच, मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे (लेखाशीर्ष-२५१५-१२३८) या योजनेंतर्गत मा.लोकप्रतिनिधींकडून विविध मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव प्राप्त होत असतात. तथापि, उपलब्ध निधी व कामाची निकड विचारात घेऊन मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना निधी मंजूर करण्याचा निर्णय शासनस्तरावर घेतला जातो.

-----------------

## गंगापूर (जि.नाशिक) धरणाजवळील मेगा पर्यटन संकुलामधील प्रकल्प सुरु करण्याबाबत

**(४४) * ३७९०७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील** : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर (जि.नाशिक) धरणाजवळील मेगा पर्यटन संकुलामधील बोट क्लब सुरु करण्याबाबत आणि ग्रेप पार्क रिसॉर्ट, साहसी क्रीडा केंद्र व कन्व्हेन्शन सेंटरचे अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत तसेच नाशिक कलाग्राम मधील अपूर्ण

कामांसाठी एक रकमी पुरेसा निधी उपलब्ध करून येथील अपूर्ण कामे पूर्ण करून सदर प्रकल्प सुरु करण्याची लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.पर्यटन मंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नाशिक बोट क्लब मधील बोटी सारंगखेडा (जि.नंदुरबार) येथे नेण्यात आल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदर बोटी नाशिकला परत आणून येथील बोट क्लब सुरु करण्यात यावे अशी मागणी दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजीच्या जिल्हा नियोजन समितीच्या सभेत करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार रावल :** (१) प्रश्नाधीन प्रकल्प सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधींचे पत्र प्राप्त झालेले आहे.

(२) होय.

(३) व (४) गंगापूर धरण, नाशिक येथील साहसी क्रीडा संकुल व ग्रेप पार्क यांचे परिचालन एप्रिल, २०१८ अखेर सुरु करण्याचे नियोजन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने केलेले आहे.

कन्व्हेन्शन सेंटरच्या बांधकामाबाबतची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

कलाग्राम प्रकल्पाचे काम पी.पी.पी. तत्वावर पूर्ण करुन प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याबाबत निविदा प्रक्रिया सुरु केलेली आहे.

नाशिक बोट क्लब खाजगी उद्योजकांच्या सहकार्याने सुरु करण्याकरिता संस्थेची नेमणूक करण्याबाबतची निविदा प्रक्रिया चालू आहे.

-----------------

## विदर्भातील अभयारण्यात वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या दुर्लक्षामुळे वन्यप्राण्यांच्या मृत्यूमध्ये वाढ झाल्याबाबत

**(४५) * ३९३०९ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील पेंच, ताडोबा, कोका, नागझिरा, उमरेड, कन्हान, चामोर्शी मारोडा या वन्यजीव अभयारण्यात गेल्या काही वर्षात प्राण्यांचा अपघाती मृत्यू, शिकार तर अन्य नैसर्गिक कारणांमुळे वन्यप्राण्यांच्या मृत्यूमध्ये वाढ झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मृत्यू वनपरिक्षेत्रात शिकार करणाऱ्या व्यक्तींकडून लावण्यात आलेल्या विजेच्या काटेरी तारांच्या कुंपणाकडे वनविभागाच्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) ताडोबा अंधारी, पेंच व नवेगाव-नागझिरा या व्याघ्र प्रकल्पांमध्ये सन २०१५ ते सन २०१७ या ३ वर्षांच्या कालावधीत अपघाताने १७, शिकारीने १४, नैसर्गिकरित्या ६० तर विजेच्या धक्याने ४ वन्यप्राण्यांचा मृत्यू झाला आहे.

(२) व (३) सन २०१५ मध्ये ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प येथे एक बिबट विद्युत पोलवर चढल्यामुळे तर सन २०१६ मध्ये जिवंत विद्युत प्रवाहीत तार अस्वल या वन्यप्राण्यावर पडल्यामुळे त्याचा मृत्यू झाला आहे. उपरोक्त प्रकरणांमध्ये वनगुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

सन २०१५ मध्ये उमरेड-कऱ्हांडला अभयारण्याचे क्षेत्राबाहेरील खाजगी शेताच्या कुंपणात विद्युतप्रवाह सोडल्यामुळे १ निलगाय व १ रानडुक्कर या वन्यप्राण्यांचा मृत्यू झाला आहे. उपरोक्त प्रकरणी प्रा. गु. रिपोर्ट नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणामध्ये ४ आरोपींविरुध्द न्यायालयात तक्रार दाखल करण्यात आली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वांगी (ता.कडेगाव, जि.सांगली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामाबाबत

**(४६) * ४०८८१ श्री.मोहनराव कदम, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांगी (ता.कडेगाव, जि.सांगली) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकामासाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर असून कामाचा कार्यारंभ आदेश निघाला असल्याचे दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून अद्याप काम सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने प्राथमिक आरोग्य केंद्र बांधकाम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) वांगी, ता.कडेगांव येथे बांधकामासाठी मंजूर झालेल्या जागेसंदर्भात जागेच्या मूळ मालकाने न्यायालयात दावा दाखल केला आहे. ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी दिनांक १४/०२/२०१८ च्या आदेशान्वये सदर जागेवरील बांधकामास पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती दिली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांच्यामार्फत जागेबाबत तडजोड करून सुधारित जागा निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार, जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## अकोट (जि.अकोला) येथे सुपरस्पेशालिटी रुग्णालय बांधणे तसेच स्त्री रुग्णालयातील खाटांची संख्या वाढविण्याबाबत

**(४७) * ४०३५१ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील अत्यंत जुन्या अशा स्त्री रुग्णालयात सद्य:स्थितीत फक्त ३०० खाटांची व्यवस्था आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जिल्ह्यातील अकोट, तेल्हारा, मूर्तिजापूर, पातुर व बाळापूर येथे स्त्री रुग्णालयाची व्यवस्था नसल्यामुळे सर्व स्त्री रुग्ण अकोला स्त्री रुग्णालयात उपचाराकरिता येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोट येथे १०० खाटांचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच अकोला शहरातील स्त्री रुग्णालयातील खाटांची संख्या ३०० वरुन ५०० करण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रस्तावावर केव्हापर्यंत अंमलबजावणी होणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

अकोला शहरातील स्त्री रूग्णालयातील ३०० खाटांची संख्या वाढवून ५०० खाटा करण्याच्या प्रस्तावास मंजूरी मिळाली असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पाळणाघरांसंदर्भात स्वतंत्र धोरण व नियमावली तयार करण्याबाबत

**(४८) * ३९४१३ डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक ३२३९६ ला दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पाळणाघरांची कार्यपध्दती निश्चित करणे व पाळणाघरांचे कायदेशीर नियमन करणेचे अनुषंगाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीची बैठक आयोजित करण्यात येवून पाळणाघरांसाठी नियमावली तयार करण्याविषयीची प्रस्तावित कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, पाळणाघरांचे नियमनांचे दृष्टीकोनातून तयार करण्यात आलेल्या नियमावलीचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्याची अंमलबजावणी केव्हापासून होणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पाळणाघरांसाठी नियमावली तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) व (४) राज्यातील पाळणाघरांची कार्यपध्दती निश्चित करणे व पाळणाघरांचे कायदेशीर नियमन करण्याच्या अनुषंगाने पाळणाघरांसाठी मराठी भाषेत नियमावलीचे प्रारुप तयार करुन दिनांक २१/०२/२०१८ रोजी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेकडून शासनास सादर करण्यात आलेले होते. सदर नियमावलीचे प्रारुप मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या मान्यतेसाठी दिनांक २२/०२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत सादर करण्यात आले होते. बैठकीत खाजगी पाळणाघरे व राजीव गांधी राष्ट्रीय पाळणाघर यासाठी एकच नियमावली तयार करुन सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## टेंभू उपसा सिंचन योजनेतील (जि.सांगली) अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४९) * ४०३६७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभू उपसा सिंचन योजनेतील (जि.सांगली) विभागीय व उपविभागीय बांधकाम कार्यालये बंद करण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सुधारित आकृतिबंध शासनाने प्रसिध्द केला असून त्यानुसार ७४ पदे रद्द करुन फक्त ५० पदांनाच मंजूरी देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुधारित आकृतिबंधानुसार ३०% हून अधिक पदे रद्द झाल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून या योजनेची कामे प्रलंबित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात पदे रद्द करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) नाही. तथापि, प्रशासकीय सोयीच्यादृष्टीने दिनांक १० जानेवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये टेंभू उपसा सिंचन प्रकल्प विभाग क्र.१, सांगली अंतर्गतच्या ५ उपविभागांची पुनर्रचना करुन विभागीय पथक निर्माण करण्यात आले आहे.

(२) नवीन पुनर्रचनेनुसार सदर विभागीय पथकासाठी आवश्यक ५० पदे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तथापि, सुधारित आकृतिबंधाचा शासन निर्णय अद्याप निर्गमित करण्यात आलेला नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे व नंदुरबार जिल्ह्यात वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी मयत मजुरांच्या नावे रोजंदारीची रक्कम काढल्याबाबत

**(५०) * ४०२१६ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे व नंदुरबार जिल्ह्यात वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी वन विभागाच्या कामावर आदिवासी पहाडपट्ट्यात मयत मजुरांच्या नावे रोजंदारीची रोख रक्कम काढल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मुख्य वन संरक्षण, धुळे यांच्याकडे तक्रार केल्यानंतरही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) श्री.अ.म.प्रकाशकर, सेवानिवृत्त वनक्षेत्रपाल, रा.नंदुरबार यांनी दिनांक २९/०१/२०१८ अन्वये तक्रार केली. तक्रारीच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी चौकशी करण्यात आली. सदर चौकशीत मयत मजुरांच्या नावे रोजंदारीची रक्कम काढल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पैठण ते कोतवाल (ता.पोलादपूर, जि.रायगड) रस्त्याचे नूतनीकरण करण्याबाबत

**(५१) * ४०६३१ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण ते कोतवाल (ता.पोलादपूर, जि.रायगड) या ५ किलोमीटर रस्त्याचे नूतनीकरण करणेबाबत लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने चौकशी करुन सदर रस्त्याचे नूतनीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) रस्ते विकास आराखडा सन २००१-२१ नुसार पोलादपूर तालुक्यातील पैठण कोतवाल खुर्द कोतवाल बु. परसुले रस्ता हा ७.०० कि.मी. लांबीचा रस्ता असून त्याचा दर्जा इजिमा १५७ असा आहे. प्रश्नाधीन रस्त्याची लांबी ५.०० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या सा.क्र. ३/० ते ५/० मध्ये रस्ता दुरुस्तीसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी निधी मंजूरीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समिती यांचेकडे जिल्हा परिषदेमार्फत पाठविण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे बावडे (ता.डहाणू, जि.पालघर) येथील रस्त्यावरील अतिक्रमण दूर करण्याबाबत

**(५२) * ४०८०४ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३७३७० ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बावडे (ता.डहाणू, जि.पालघर) येथील गट नं. २१ या रस्त्यावर श्री.बबन चुरी यांनी अतिक्रमण केल्याने ते हटविण्याबाबत तत्कालीन सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामसेवक यांना वारंवार नोटीसा बजावून देखील अतिक्रमण हटविण्यात न आल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १४५ अन्वये गटविकास अधिकारी, पंचायत समिती, डहाणू यांनी

उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत, जि.प., ठाणे यांना दिनांक २४ मार्च, २०११ रोजी प्रस्ताव सादर केला, परंतु ग्रामपंचायतीची मुदत दिनांक १६ जुलै, २०११ रोजी संपुष्टात आल्याने त्यावर कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन निवडून आलेल्या समितीने सदरचे अतिक्रमण दूर न केल्याने सरपंच, ग्रामपंचायत बावडे यांच्याविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ३९(१) अन्वये कारवाई करण्याबाबत दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच तत्कालीन २ ग्रामसेवक, कार्यरत ग्रामसेवक अशा ३ जणांविरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषद, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ (३) अन्वये कारवाई करण्याबाबत नोटीसा बजावण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) दिनांक २६/०६/२००८ रोजी प्राप्त तक्रारीनुसार श्री.बबन चुरी यांनी अतिक्रमण केल्याचे सिद्ध झाल्याने वेळोवेळी तत्कालीन तसेच विद्यमान ग्रामपंचायत कार्यकारिणीचे सरपंच व ग्रामसेवक यांना अतिक्रमण काढण्याच्या नोटीसा बजावण्यात आल्या. तसेच त्यांचेविरुद्ध कारवाई करण्याबाबतसुद्धा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. गत २ ग्रामपंचायतींच्या कार्यकारिणीची मुदत संपुष्टात आल्याने तत्कालीन सरपंचांवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ३९(१) अन्वये कार्यवाही करता आली नाही. विद्यमान सरपंच यांचेवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ३९(१) अन्वये तसेच तत्कालीन २ ग्रामसेवक व कार्यरत ग्रामसेवक यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (शिस्त व अपिल) अधिनियम १९६४ चे कलम ३ अन्वये कारवाई प्रस्तावित करण्यात येत आहे.

अतिक्रमण निश्चित करुन दूर करण्याच्या अनुषंगाने ग्रामपंचायत बावडा यांचेकडून दिनांक १२/०१/२०१८ रोजी करण्यात आलेल्या लेखी मागणीनुसार दिनांक २१/०१/२०१८ रोजी मोजणीवेळी लगतचे खातेदार यांनी हरकत घेतल्याने मोजणी होऊ शकली नाही. आता ग्रामपंचायतीने पुन्हा मोजणी कामी मोजणी फी भरली असून मोजणीचे काम पूर्ण झाल्यावर सदरचे अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिराढोण (ता.कंधार, जि.नांदेड) येथील जंगलात शतकोटी वृक्ष लागवड योजनेतील गैरव्यवहाराबाबत

**(५३) * ४०९०४ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराढोण (ता.कंधार, जि.नांदेड) येथील जंगलात शतकोटी वृक्ष लागवड योजनेतील गैरव्यवहार उघड होऊ नये यासाठी वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी लाग लावली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीत अनेक जातींचे वृक्ष जळून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आगीच्या चौकशीचा अहवाल अद्याप गोपनीय ठेवून त्यानुसार संबंधितांवर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार :** (१) नांदेड वनक्षेत्रांतर्गत शिराढोण येथील क. नं.५७२/२, २० हे. रोपवन क्षेत्रामध्ये वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रमांतर्गत सन २०१६ च्या पावसाळयात घेण्यात आलेल्या रोपवन क्षेत्रामध्ये दिनांक ३०/१२/२०१७ रोजी जाळरेषा घेताना रोपवन क्षेत्रास आग लागून १२ हेक्टर बाधित झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) या आगीमध्ये वृक्ष जळालेले नसून रोपवन क्षेत्रातील १२ हेक्टर क्षेत्रावरील साधारण १९,२०० रोपे जळाली आहेत. सदर रोपांची रोप निर्मिती व रोप लागवड असे एकूण रुपये ४.९२ लक्ष इतके नुकसान झाले आहे.

(३), (४) व (५) सदरहू प्रकरणी दोषी आढळून आलेले संबंधित वनरक्षक, शिराढोण व दोन वनमजूर यांना दिनांक ६/१/२०१८ रोजी निलंबित करण्यात आले आहे. तसेच संबंधित वनपाल यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम १० अंतर्गत दोषारोपपत्र जारी करण्यात आले आहे.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी कर्मचाऱ्यांना किमान वेतनाच्या फरकाची रक्कम अदा करण्याबाबत

**(५४) * ४१००६ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील जत, वाळवा, मिरज, तासगांव, शिराळा व आटपाडी तालुक्यातील १० ग्रामपंचायतींनी १५ कर्मचाऱ्यांना किमान वेतनाच्या फरकाची रक्कम रुपये १५,२८,४४९/- दिले नसल्याने सांगलीच्या औद्योगिक न्यायालयाने उक्त ग्रामपंचायतींची मालमत्ता जप्त करुन कर्मचाऱ्यांना थकबाकीची रक्कम दयावी असे आदेश जिल्हाधिकारी, सांगली यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दहा ग्रामपंचायतींची नावे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

मे.औद्योगिक न्यायालय, सांगली यांच्या आदेशान्वये सांगली जिल्ह्यातील जत, वाळवा, मिरज, तासगाव, शिराळा व आटपाडी तालुक्यातील १० ग्रामपंचायतींनी १३ कर्मचाऱ्यांचे किमान वेतनाच्या फरकाची रक्कम रुपये १५,२८,०५५/- वसूल करून कोर्टात जमा करणे किंवा संबंधित कर्मचाऱ्यास अदा करण्यास जिल्हाधिकारी, सांगली यांना आदेशित केले आहे.

(२) १) डफळापूर, ता.जत, २) प्रतापूर, ता.जत, ३) शेखरवाडी, ता.वाळवा, ४) पोखर्णी, ता.वाळवा, ५) सावळी, ता.मिरज, ६) बुधगाव, ता.मिरज, ७) म्हैशाळ, ता.मिरज, ८) गोटेवाडी, ता.तासगांव, ९) कापरी, ता.शिराळा, १०) मानेवाडी, ता.आटपाडी या दहा ग्रामपंचायती आहेत.

(३) मा.न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन केलेल्या चौकशीनुसार,-

ग्रामपंचायत सावळी, ग्रामपंचायत बुधगांव, ग्रामपंचायत डफळापूर, ग्रामपंचायत गोटेवाडी, ग्रामपंचायत मानेवाडी - या ग्रामपंचायतीमधील थकीत वेतन असलेले ७ कर्मचारी हे आकृतिबंधातील नसून हंगामी स्वरुपात त्यांची नियुक्ती ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आली होती. या कर्मचाऱ्यांना शासनाकडून वेतन अनुदान देय होत नाही. ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती नसल्याने वेतनाच्या फरकाची रक्कम अदा करणे प्रलंबित होते.

ग्रामपंचायत म्हैसाळ, ग्रामपंचायत प्रतापूर, ग्रामपंचायत शेखरवाडी, ग्रामपंचायत गोटेवाडी, ग्रामपंचायत कापरी - या ग्रामपंचायतीमधील थकीत वेतन असलेले ५ कर्मचारी हे आकृतिबंधातील असून या कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनासाठी शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान कर्मचाऱ्यांस अदा झाले होते. तथापि, किमान वेतन फरकाची रक्कम ग्रामपंचायतीची आर्थिक स्थिती नसल्याने ग्रामपंचायतीकडून अदा झाली नव्हती.

<u>ग्रामपंचायत पोखर्णी</u> - या ग्रामपंचायतीमधील थकीत वेतन असलेला कर्मचारी हा आकृतिबंधातील आहे. तथापि सदर कर्मचारी सतत गैरहजर असल्याने, ग्रामपंचायतीने त्यास कमी केल्याने थकीत रक्कम अदा केली नव्हती.

यानुसार, थकीत वेतनाची प्रलंबित असलेल्या एकूण रुपये १९,००,४३४/- इतक्या रकमेपैकी रुपये ११,१३,७१५/- इतकी रक्कम ग्रामपंचायतीकडून अदा करण्यात आली आहे. उर्वरित (रुपये ३२,३०५/- इतकी रक्कम तडजोड करुन) रुपये ७,५४,४१४/- इतकी रक्कम अदा करण्याची कार्यवाही ग्रामपंचायतीकडून सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्हा परिषदेच्या शाळा दुरुस्ती आणि नवीन इमारत बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(५५) * ३८०२७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३४९१५ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यात सन २०१६-१७ मध्ये ५० प्राथमिक शाळांच्या ६७ वर्ग खोल्या व ४५ उच्च प्राथमिक शाळांच्या ९९ वर्ग खोल्यांची दुरुस्ती, ८३ शाळांसाठी आर.टी.ई. कायद्यान्वये १६० वर्ग खोल्या यांचे बांधकाम करण्याची गरज असून तालुक्यातील ३३१ पैकी ८० वर्ग खोल्या धोकादायक झाल्या असल्यामुळे त्यांचे बांधकाम करण्यासाठी रुपये २००/- कोटीचा निधी उपलब्ध करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्हा परिषदेकडून जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा बांधकाम आराखडा तयार करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे काय व आराखड्याचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, बीड जिल्हा परिषदेच्या धोकादायक वर्ग खोल्यांचे बांधकाम करण्यासाठी जिल्हा परिषदेने शासनाव्यतिरिक्त इतरांकडे निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शाळा बांधकामासाठी व निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) U-DISE २०१६ नुसार, सन २०१७-१८ करिता जिल्हा परिषद शाळा बांधकामासाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत रुपये ५९४०.६८ लक्ष इतक्या निधीची मागणी करण्यात आली. तथापि, सदर कामासाठी रुपये ३८८.८० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. सदर तरतूद विचारात घेऊन जिल्हा परिषद शाळांच्या ४६ वर्ग खोल्या नव्याने बांधण्याबाबत, १३ प्राथमिक शाळांची व ११ उच्च प्राथमिक शाळांची मोठी दुरुस्तीची कामे मंजूर करण्यात आली आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सन २०१८-१९ मधील शाळा बांधकामाचा आराखडा तयार करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा रुग्णालयातील (ता.अलिबाग, जि.रायगड) बंधपत्रित कंत्राटी परिचारिकांना वेतन अदा करण्याबाबत

**(५६) * ३९९२० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) जिल्हा सामान्य रूग्णालयात गेल्या अनेक महिन्यापासून बंधपत्रित कंत्राटी स्वरूपात परिचारिका काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा रूग्ण प्रशासनाकडून दर महिन्याला या परिचारिकांचे वेतन अदा करण्यात येत होते, परंतु माहे ऑक्टोबर, २०१७ ते जानेवारी, २०१८ पर्यंतचे बंधपत्रित कंत्राटी परिचारिकांचे वेतन देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कंत्राटी परिचारिकांचे वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

एका परिचारिकेची बदली झाल्यानंतर त्यांचे अंतिम वेतन प्रमाणपत्र व वेतन अदा न केल्याचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे वेतन अदा करण्यात आले नव्हते. तथापि, उक्त प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांचे वेतन अदा करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील ब्रिटिशकालीन पुलांची दुरुस्ती करण्याबाबत

**(५७) * ४०४०२ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील ब्रिटिशकालीन डिकसळ पुलावरुन तसेच बारामती, पुणे या गावांना जोडणारा डिकसळ-कोंढार चिंचोली या जीर्ण झालेल्या पुलावरुन वाहतुक सुरु असल्याने जीर्ण झालेला सदर पूल कोसळून दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ब्रिटीशकालीन जीर्ण झालेल्या पुलांचे संरचनात्मक लेक्षा परिक्षण करुन पुलांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

सदर पुलावरुन जड वाहतुक बंद करण्यात आली आहे. तथापि, हलकी वाहने, दुचाकी इ. वाहतूक सुरु आहे.

या रस्त्यास भिगवण-राशीन हा पर्यायी रस्ता व पूल उपलब्ध असून सदर रस्त्यावरुन वाहतुक सुरु आहे.

(२) अधिक्षक अभियंता, संकल्पचित्र मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांनी पाहणी केलेली असून सदरचा पूल वाहतुकीस योग्य नाही. सदर पुलाचे आयुष्यमान संपल्याने संरचनात्मक लेखा परिक्षण करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर ठिकाणी नवीन पूल बांधणे आवश्यक आहे.

प्रश्नांकित पूल हा उजनी धरणाच्या बुडीत क्षेत्रात येत असल्याने सदर पुलाचे काम पाटबंधारे विभागाकडून मंजूर करणेकामी कार्यकारी अभियंता, कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना जिल्हा परिषदेमार्फत पाठविण्यात आले आहे.

तसेच पुलाचे संकल्पचित्र सर्वेक्षण करणेसाठीची यंत्रणा केवळ सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असल्याने तसेच नवीन पूल बांधण्याचा कार्यक्रम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राबविला जात असल्याने सदर नवीन पुलाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून होणे अपेक्षित आहे. तसे सार्वजनिक बांधकाम विभागास जिल्हा परिषदेमार्फत कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ग्रामीण रुग्णालय येवला व नगरसूल (जि.नाशिक) येथील वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(५८) * ३९३१० श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २६९१९ ला दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला व नगरसूल (जि.नाशिक) येथील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण रुग्णालय येवला (जि.नाशिक) येथील एक वैद्यकीय अधिक्षक व तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांपैकी फक्त एक वैद्यकीय अधिकारी पद भरलेले असल्याने तसेच ग्रामीण रुग्णालय नगरसूल येथील वैद्यकीय अधिक्षक व वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय येवला, जि.नाशिक येथे वैद्यकीय अधिक्षकाचे एक पद मंजूर असून सदर पद रिक्त आहे. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांची तीन पदे मंजूर असून एक पद भरलेले आहे. ग्रामीण रुग्णालय नगरसूल, जि.नाशिक येथील वैद्यकीय अधिक्षकाचे पद रिक्त आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांची तीन पदे मंजूर असून त्यापैकी दोन पदे भरलेली आहेत व एक पद रिक्त आहे. सदर रुग्णालयातील उपलब्ध वैद्यकीय अधिकारी तसेच एनएचएम व आयपीएचएस अंतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णांना रुग्णसेवा पुरविण्यात येते.

(३) वैद्यकीय अधिक्षकाची पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडयास अंतिम मान्यता प्रदान करण्याबाबत

**(५९) * ३९४१४ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३२०७७ ला दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी संपन्न झालेल्या राज्य जल परिषदेच्या बैठकीत दिलेल्या निर्देशाप्रमाणे गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा, राज्य जल मंडळासमोर सादर करण्यात आला व त्यास राज्य जल मंडळाने दिनांक ८ मे, २०१५ रोजी तत्वतः मान्यता दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा अंतिम करण्यासाठी स्थापन केलेल्या तज्ञ समितीचा अहवाल दिनांक १३ जुलै, २०१७ रोजी शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, तज्ञ समितीकडून शासनास सादर करण्यात आलेल्या गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडयास मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील राज्य जल मंडळाच्या बैठकीत मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर आराखडयास राज्य जल मंडळाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या राज्य जल परिषदेच्या बैठकीत मान्यता घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, प्रस्तुत जल आराखडयास अंतिम मान्यता प्रदान करण्यात आली आहे काय,
(६) नसल्यास, उक्त कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे व सदर आराखडयास केव्हापर्यंत मान्यता मिळणे अपेक्षित आहे ?

**श्री.गिरीष महाजन :** (१) दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या पहिल्या राज्य जल परिषदेच्या बैठकीत दिलेल्या निर्देशाप्रमाणे गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडा, दिनांक ८ मे, २०१५ रोजी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या राज्य जल मंडळाच्या ७ व्या बैठकीत सादर करण्यात आला. सदर बैठकीत राज्य जल मंडळाने गोदावरी खोरे एकात्मिक जल आराखडयास सहमती दर्शवून डॉ.माधवराव चितळे, जल तज्ञ यांचे अभिप्राय घेऊन राज्य जल परिषदेसमोर सादर करण्यास मान्यता दिली.

(२) होय.

(३) गोदावरी नदी खोरे अभिकरणाकडून "एकात्मिक जल आराखडा-गोदावरी खोरे" दिनांक ०७/०८/२०१७ रोजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य जल मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात येवून सदर आराखडा राज्य जल परिषदेसमोर मान्यतेसाठी सादर करण्यास परवानगी देण्यात आली.

(४) गोदावरी नदी खोऱ्याच्या एकात्मिक जल आराखड्यास मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ रोजी झालेल्या राज्य जल परिषदेच्या चतुर्थ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

(५) होय.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय रुग्णालयात आरोग्य विभागाने सीसीटिव्ही यंत्रणा बसविण्याबाबत

**(६०) * ४०७७८ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय रुग्णालयातून लहान बालके पळविण्याच्या घटना घडत असताना अनेक रुग्णालयात आरोग्य विभागाने सीसीटिव्ही कॅमेरे बसविले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईतील केईएम, नायर, सायन व कूपर रुग्णालयात अनेक सुरक्षा रक्षकांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासकीय रुग्णालयात रुग्णांची सुरक्षा ठेवण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे. तथापि रुग्णालय सुरक्षेच्यादृष्टीने जिल्हा शल्य चिकीत्सक व वैद्यकीय अधिक्षकाना रुग्णालयाच्या सर्व भागांमध्ये सीसीटीव्ही कार्यान्वित करण्याबाबत दिनांक १६/०५/२०१७ रोजी सूचना देण्यात आल्या आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे. महानगरपालिका रुग्णालय येथील सुरक्षारक्षकांची पदांची पूर्तता महाराष्ट्र सुरक्षा मंडळ तसेच मुंबई ठाणे सुरक्षा मंडळ यांचेकडून करण्यात येत आहे.
(३) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रुग्णालयाच्या सर्व संवेदनशील क्षेत्रामध्ये सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची सुविधा उपलब्ध असावी. यामध्ये नवजात कक्ष व प्रसूती पश्चात कक्ष तसेच बालविभागांचा समावेश आहे. त्या अनुषंगाने सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील आरोग्य संस्थांतर्गत ३६ ठिकाणी (जिल्हा सामान्य रुग्णालये व स्त्री रुग्णालये) येथे सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, रायगड यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याच्या ठरावाबाबत

**(६१) * ४०९१४ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, रायगड यांना रायगड जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये सक्तीच्या रजेवर पाठविण्याबाबतचा ठराव घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठरावाची अंमलबजावणी झाली आहे काय,

(३) असल्यास, शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, रायगड यांनी शासकीय कामात दिरंगाई करणे, विकास कामे प्रलंबित ठेवणे, जिल्हयातील लोकप्रतिनिधींना डावलून गैरपध्दतीने प्रशासकीय कामकाज करणे, प्रत्येक नस्तीवर निर्णय न घेता, वरिष्ठस्तरावर वारंवार मार्गदर्शन व अभिप्राय मागणे तसेच शिक्षणाधिकारी (प्राथ.), जि.प. रायगड यांच्या प्रशासकीय दुर्लक्षतेमुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांची खुर्ची जप्त करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत अशा निष्क्रिय अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही. मात्र शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांच्या विरुध्दच्या तक्रारीचा अहवाल शासनास पाठविण्याचा ठराव दिनांक ०९/०१/२०१८ रोजी घेण्यात आला.

(२) व (३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, रायगड यांचेविरुध्द प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने कारवाई करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बिलोली तालुका (जि.नांदेड) येथे पंतप्रधान आवास योजना व रमाई योजनेंतर्गत लाभधारकांच्या बँक खात्यावर अनुदान जमा करण्याबाबत

**(६२) * ४०९०७ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिलोली तालुका (जि.नांदेड) येथे सन २०१६-१७ या वर्षामध्ये पंतप्रधान आवास योजना व रमाई योजनेंतर्गत चालू असलेल्या व बांधकाम पूर्ण केलेल्या घरकुल लाभधारकांच्या बँक खात्यावर वेळेवर अनुदान जमा होत नसल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही ग्रामसेवक लाभधारकांकडून पैसे घेतल्याशिवाय सहकार्य करीत नसल्यामुळे येथे संताप व्यक्त होत असून चिरली येथील एका लाभधारकाची फाईल गहाळ करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ग्रामसेवक व फाईल गहाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन लाभधारकांचे अनुदान वेळेवर वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

तथापि, घरकुल लाभधारकांनी केलेल्या बांधकामाच्या टप्प्यानुसार एफ.टी.ओ. प्रक्रिया पूर्ण करुन पी.एफ.एम.एस प्रणाली द्वारा लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा केली जाते. परंतु काही तांत्रिक कारणामुळे एफ.टी.ओ. केल्यानंतरही पी.एफ.एम.एस प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा होण्यास काहीसा विलंब होत आहे.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.